
वर्ष : सोळावे
जानेवारी २०२४
अंक : पहिला
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ४८


# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ




कशी होती सीता? विचारी आणि खंबीर? की हतबल आणि भावुक?
नियतीची बळी ही सीतेबद्दलची धारणा खरी,
की रामरक्षेतलं तिचं 'सीताशक्तिः' हे रूप खरं?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या सीतेच्या विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी
अभिराम भडकमकर यांची कादंबरी...






हे छोटेखानी लेख म्हणजे
जणू काही सोनचाफ्याची फुलंच.
त्या फुलांचा सुगंध जसा मन मोहरवून टाकणारा असतो,
तसेच हे लेखही सात्त्विक समाधान देणारे आहेत.
चौफेर संचार करणारे, प्रेरणेच्या पणत्या पेटवणारे
आणि भावविश्व समृद्ध करणारेही!

**ओंजळीतील चाफा**
स्वानंद कुलकर्णी

समाजात समांतरपणे अनेक व्यवस्था कार्यरत असतात. क्षेत्र कोणतंही असो, तिथे भ्रष्ट आणि वेळकाढू माणसं हमखास असतात. एकंदरच माणसाचा जीवनव्यवहार हा परस्परविरोधी असतो. या व्यवहाराचं एक चित्र म्हणजे...

**संभ्रमाची गोष्ट**
पी. विठ्ठल




कविकुलगुरू कालिदासाचे 'मेघदूत' हे खंडकाव्य
म्हणजे अभिजात गीर्वाणभाषेचा एक अनुपम अलंकार!
पत्नीच्या विरहाने व्याकुळलेल्या यक्षाने
आपला संदेश घेऊन एका मेघालाच रामगिरीहून
अलकानगरीकडे जाण्याची विनवणी केली.
कालिदासाच्या 'मेघदूता'चा जणू
'सिक्वेल' म्हणजे या दूताच्या प्रवासाचे वर्णन करणारे...

**मी सखा मेघदूत**
हर्षदा पंडित

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी ‘राजहंस’ प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
तृप्ती देशपांडे

वर्ष सोळावे :
अंक पहिला
१५ जानेवारी २०२४
मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :


- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *‘पत्र आणि मैत्र’ आणि ‘वाणी आणि लेखणी’*
  – शेषराव मोरे / ९
- चित्र पाहीन आवडी : नितीन हडप / १५
- असे जन्मले पुस्तक!
  *शब्द सूर जपून ठेव*
  – नेहा लिमये / १९
- आठवणींच्या खिडकीतून
  *श्री. जब्बारस्वामी पटेल*
  – श्रीराम रानडे / २३
- क...कवितेचा : प्रसन्न दाभोलकर / २७
- उद्गार
  *वसुंधरेचे शोधयात्री - डॉ. अनुराग लव्हेकर*
  – नितीन वैद्य / २९
- राजहंसी पार / ३१
- वाचकांच्या मनातलं... / ३७


या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९/२४४६५०६३.
E-mail : rajhansgranthvedh@gmail.com ● Website : www.rajhansprakashan.com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके



गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच 'दिगमा' या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...

### पत्र आणि मैत्र

दिलीप माजगावकर

दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...



### वाणी आणि लेखणी

दिलीप माजगावकर

दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट.ख. ₹ ८०)



संगीत जुने असो वा नवे, 'आपले' असो वा 'त्यांचे', शास्त्रीय-उपशास्त्रीय असो वा चित्रपटसंगीत. नवी-जुनी गाणी ऐकताना त्यामधील उमजलेल्या बारकाव्यांची आस्वादकाच्या भूमिकेतून केलेली मांडणी म्हणजे हे पुस्तक.

### गाता रहे...

सुहास किर्लोस्कर

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ४०)



# संपादकीय

*पुस्तकांच्या रूपाने पुढच्या पिढीपर्यंत ज्ञान पोहोचविणारा पुस्तक महोत्सव चांगल्या व मानसिकदृष्ट्या सुदृढ समाजनिर्मितीचे आणि राष्ट्रनिर्मितीचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळेच मुलांना आणि खरे तर वाचनापासून दूर गेलेल्या सर्वांनाच पुस्तकापर्यंत पोहोचविण्यासाठी पुस्तक महोत्सवासारखे उपक्रम राबवणे महत्त्वाचे आहे.*

नमस्कार वाचकहो,

२०२३ वर्ष सरले आणि आपण २०२४ या इंग्रजी नवीन वर्षात प्रवेश केला. गेल्या वर्षीचा मागोवा घेतला, तर वाचनसंस्कृतीच्या दृष्टीने अतिशय दिलासा देणारी घटना घडल्याचे आपल्याला दिसून येईल आणि ती म्हणजे 'पुणे पुस्तक महोत्सव, २०२३'. याबद्दल तुम्ही सगळ्यांनी ऐकले, वाचले, पाहिलेही असेलच. कित्येकांनी तिथे प्रत्यक्ष जाऊन त्याचा आनंदही घेतला असेल. पण तरीही त्याची नोंद घेतलीच पाहिजे, इतकी ही घटना महत्त्वाची आहे. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून तर पुणे प्रसिद्ध आहेच, तसेच 'महोत्सवांचे शहर' म्हणूनही त्याची गणना केली जाते. पुणे हे 'शिक्षणाचे माहेरघर' म्हणूनसुद्धा ओळखले जाते. त्याला आता पुस्तकांची जोड मिळाली आहे. आता ते 'वाचनाचे शहर' म्हणूनही ओळखले जाईल, इतका उत्तम प्रतिसाद या महोत्सवाला मिळाला, तसेच यात चार विश्वविक्रमांची नोंद झाली; म्हणूनच त्याबद्दल तुमच्याशी बोलायचे असे ठरवले.

'राष्ट्रीय पुस्तक न्यास' (नॅशनल बुक ट्रस्ट) या संस्थेच्या वतीने पुण्यातील 'फर्ग्युसन महाविद्यालया'च्या मैदानावर दि. १६ ते २४ डिसेंबर २०२३ या कालावधीत हा महोत्सव झाला. पुस्तकांची दोनशेहून अधिक दालने होती, तर पंधरापेक्षा अधिक भारतीय भाषांतील हजारो पुस्तके इथे पाहायला मिळाली. त्याचप्रमाणे विविध राज्यांतील खाद्यसंस्कृतीची चव अनुभवता आली. या महोत्सवात १०० पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या निमित्ताने पुणेकरांना प्रसिद्ध कवी कुमार विश्वास, गायक नंदेश उमप, लेखक विक्रम संपत, पत्रकार सौरभ द्विवेदी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर या सर्वांना प्रत्यक्ष ऐकता आले, तसेच 'तुकाराम दर्शन महानाट्य' आणि 'शिवराज्याभिषेक सोहळा' अनुभवता आला. युवकांसाठी टॅलेंट

हंट, मुलांसाठी बालसाहित्यिकांनी गोष्टी सांगणे असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, सर्जनशीलतेला वाव देणारे आणि वाचनसंस्कृती वाढवणारे विविध उपक्रम खुल्या रंगमंचावर आणि ॲम्फी थिएटर येथे राबवण्यात आले. त्यामुळेच या महोत्सवाला सर्व वयोगटांतील व्यक्तींचा उत्तम प्रतिसाद मिळाला, हे विशेषकरून नमूद करावेसे वाटते.

या महोत्सवाच्या निमित्ताने १४ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर ३०६६ पालकांनी आपल्या मुलांना गोष्ट वाचून दाखवण्याचा उपक्रम अतिशय उत्साही वातावरणात पार पडला. याची नोंद 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये झाली. त्याच दिवशी दुपारी १२ ते १ दरम्यान 'शांतता... पुणेकर वाचत आहे' हे अभिनव अभियान पार पडले. 'तुम्ही जिथे असाल, तिथे पुस्तक वाचायचे आहे. त्याची माहिती सोशल मीडियावर mybookstory हा हॅशटॅग वापरून शेअर करता येईल', असे महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले. या दोन्ही उपक्रमांना सर्व स्तरांतून भरभरून प्रतिसाद मिळाला. महोत्सवाची सुरुवात अशा पद्धतीने राबवून आयोजकांनी खरोखर सर्वांना याकडे आकर्षून घेतले. याद्वारे जागतिक पुस्तकांची राजधानी बनण्याची क्षमता पुणे शहरात आहे, या युनेस्कोच्या निकषांना जणू पुष्टीच मिळाली, असे नक्कीच म्हणता येईल.

महोत्सवाचा तिसरा उपक्रम म्हणजे १५ डिसेंबरला फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर 'भारत' हा शब्द सुमारे ७५०० हजार पुस्तकांनी लिहिण्यात आला. १६ डिसेंबरला 'जयतु भारत!' हे १८,७५१ पुस्तकांच्या माध्यमातून साकारण्यात आले. २१ डिसेंबरला तब्बल ११ हजार ४३ नागरिकांनी एकाच पुस्तकातील एक परिच्छेद तीस सेकंदांत वाचून आणखी एक विश्वविक्रम नोंदवला. या तिन्ही उपक्रमांची नोंद 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये झाली.

'परिच्छेद वाचणे' या उपक्रमात 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा'च्या तंत्रज्ञान विभागाचे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन हा विश्वविक्रम यशस्वी केला. एकाच परिच्छेदाचे वाचन करतानाचे व्हिडिओ तयार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. सर्वांचा आशय एकच हवा, एकासारखे दुसरे असू नये अशी आव्हाने त्यात होती. यामुळे 'फेस रेकग्निशन' तंत्राचा वापर करण्यात आला. पुणे पुस्तक महोत्सवाला भेट देणाऱ्या नागरिकांकडून परिच्छेद वाचून घेऊन व्हिडिओ तयार करण्यात आले. याशिवाय राज्यभरातून नागरिकांनी व्हिडिओ पाठवले. पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांना या निमित्ताने एक प्रकारे इंटर्नशिप मिळाली. त्यांनी १४ हजारांपेक्षा अधिक नागरिकांचे व्हिडिओ रेकॉर्ड केले. या व्हिडिओंद्वारा डेटा ॲनालिसिस, प्रोसेसिंग, इमेज प्रोसेसिंग, व्हिडिओ प्रोसेसिंग त्यांना शिकता आले.

म्हणजेच केवळ पारंपरिक पुस्तकवाचन एवढ्यापुरता हा महोत्सव नाही, तर त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोडही आहे, हे तरुणवर्गाच्या लक्षात आले.

या महोत्सवात तब्बल ८.५ लाख पुस्तकांची विक्री झाली, तसेच ११ कोटी रुपयांची उलाढाल झाली आणि साधारण ४.५ लाख लोकांनी या महोत्सवाला भेट दिली. विशेष म्हणजे येथे भेट देणाऱ्या आणि पुस्तकांची खरेदी करणाऱ्यांमध्ये शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक होती. आजची तरुण पिढी वाचत नाही, हे विधान सरसकट केले जाऊ नये, हे इथे अधोरेखित करावेसे वाटते.


खरे तर ज्ञान प्राप्त करण्यासाठी पुस्तकासारखा अन्य मार्गदर्शक नाही, तसेच ज्ञानप्रवाह सर्वदूर पोहोचविण्यासाठी पुस्तकासारखा अन्य मार्ग नाही. ज्ञान एखाद्या वर्गापुरतेच संकुचित ठेवल्यास समाज प्रगती करू शकत नाही, पुस्तकांमुळे ते समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचते. पुस्तकामुळे व्यक्तीचे विचार घडतात आणि त्यातून ती व्यक्ती घडत असते. व्यक्तीला जीवनाची दिशा सापडते. तिच्या विचारांच्या कक्षा रुंदवतात. पुस्तके आपल्यात सामाजिक जाणिवा निर्माण करतात. समाजात कोणते साहित्य वाचले जाते, यातून समाजाचे प्रतिबिंब पाहायला मिळते. ऐतिहासिक पुस्तकांच्या माध्यमातून आपली स्वत:ची ओळख, स्वातंत्र्याचे मोल समजते. चांगले आणि यशस्वी जीवन यांतील फरक समजून घेण्यासाठी पुस्तके खूप मोलाची भूमिका बजावतात, म्हणूनच जीवनाचे विविध पैलू समजून घेण्यासाठी विविध प्रकारची पुस्तके वाचली पाहिजेत. पुस्तके हा आपला अनमोल ठेवा आहे. राष्ट्राकडे असलेल्या पैशाच्या सुबत्तेपेक्षा पुस्तकरूपी विचारांची संपत्ती किती मोठी आहे, यावरून राष्ट्राचे वैभव ठरते. पुस्तकांच्या रूपाने पुढच्या पिढीपर्यंत ज्ञान पोहोचविणारा पुस्तक महोत्सव चांगल्या व मानसिकदृष्ट्या सुदृढ समाजनिर्मितीचे आणि राष्ट्रनिर्मितीचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळेच मुलांना आणि खरे तर वाचनापासून दूर गेलेल्या सर्वांनाच पुस्तकापर्यंत पोहोचविण्यासाठी पुस्तक महोत्सवासारखे उपक्रम राबवणे किती महत्त्वाचे आहे, हे यातून दिसले.

पुणे पुस्तक महोत्सव खऱ्या अर्थी वाचन, कला, साहित्य, खाद्य अशा विविध संस्कृतींचा संगम असल्याचे दिसून आले. अशाच प्रकारचे महोत्सव देशभरात अनेक ठिकाणी राबविले जावोत आणि त्याद्वारे वाचनसंस्कृती वृद्धिंगत होवो, हीच वर्षारंभी आपण त्या विद्येच्या देवतेला प्रार्थना करू या. येणारे वर्ष आपल्या सर्वांना वाचनसमृद्ध करणारे ठरावे, हीच शुभकामना!

**आरती घारे**
कार्यकारी संपादक

अभिनंदन!

## लोकमंगल समूह, सोलापूर




राज्यस्तरीय साहित्य
पुरस्कार

काळ्यानिळ्या रेषा

◆

राजू बाविस्कर




अभिनंदन!

## तत्त्वबोध विचार मंच
## नऊ सर्कल साखरवाडी, फलटण



प्राचार्य शिवाजीराव भोसले
विवेकजागर पुरस्कार २०२३

माणूस असा का वागतो?

◆

अंजली चिपलकट्टी




अभिनंदन!

## विदर्भ साहित्य संघ



पु. य. देशपांडे स्मृती
कादंबरी पुरस्कार

महाकारुणिक

◆

नरेन्द्र शेलार



## राजहंसी ग्रंथसृष्टी

# ‘पत्र आणि मैत्र’ आणि ‘वाणी आणि लेखणी’

*राजहंस प्रकाशनाचे सर्वेसर्वा दिलीप माजगावकर यांची ‘पत्र आणि मैत्र’ व ‘वाणी आणि लेखणी’ ही दोन पुस्तके नुकतीच प्रकाशित झाली. ज्येष्ठ विचारवंत व लेखक शेषराव मोरे यांची या पुस्तकांवर आलेली ही प्रतिक्रिया.*

तुमच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त ‘पत्र आणि मैत्र’ व ‘वाणी आणि लेखणी’ हे अनन्य स्वरूपाचे ग्रंथ काढण्याची कल्पना ज्या सुहृदांनी काढली व त्यास आग्रहपूर्वक तुमची संमती मिळविली, त्याबद्दल त्यांचे व तुम्ही त्यास संमती दिल्याबद्दल तुमचेही आभार मानावेत तेवढे थोडेच. तुम्ही काही आत्मचरित्र लिहिले नसते व असा एक प्रकाशक आहे, हे आजच्या पिढीला व होऊन गेला, हे पुढच्या मराठी पिढीला कळलेही नसते. उत्तम व यशस्वी प्रकाशक व्यवसाय कसा करावा, याची शिकवण वा मार्गदर्शन करण्यासाठी लिहिलेले हे ग्रंथ नव्हेत. ग्रंथांच्या मलपृष्ठावर लिहिल्याप्रमाणे ‘महाराष्ट्राच्या साहित्यिक व सांस्कृतिक संचिताचा व इतिहासाचा हे ग्रंथ छोटा पट’च आहेत. त्यांत गेल्या ५०-६० वर्षांतील साहित्यिकांची व त्यांच्या साहित्याची इतकी नावे आली आहेत की, त्यांची मोजदाद नाही. त्यांत विविध साहित्यिकच नव्हेत; तर गीतकार, संगीतकार, चित्रकार, कलाकार, इतिहासकार, तत्त्वज्ञ, राजकीय नेते व अन्य प्रकाशक व व्यक्ती अशा मांदियाळीचे दर्शन घडते. त्यांच्याशी तुमचा आलेला संबंध व त्याबरोबरच तुमच्या व्यक्तिमत्त्वाचे व विविधअंगी अभ्यासाचे दर्शनही घडते. प्रकाशक म्हणजे केवळ पुस्तके छापून त्यांचे वितरण करणारा व्यावसायिक नसतो, तर त्याला किती विविध व्यक्तींशी बौद्धिक, ज्ञानक्षेत्रीय व भावनिक संबंध निर्माण करावे लागतात, हे या ग्रंथांवरून कळून येते. यासाठीच तुम्ही म्हटलेले आहे की, ‘प्रकाशन व्यवसायात काम करताना मिळणाऱ्या आनंदाची तुलना कशाशीही होऊ शकत नाही.’

प्रकाशनासाठी आलेल्या ग्रंथांचे तर वाचन आपण करताच, पण अन्य ग्रंथांचे (त्यांत इंग्रजी ग्रंथही आले) आपले वाचन किती प्रचंड आहे, याची प्रचिती या दोन ग्रंथांवरून येते. तुम्ही उत्तम वाचक आहात. समीक्षकही आहात. तुमच्या बंधूने व

मुलाखत घेणाऱ्यांनी तुम्हाला 'रत्नपारखी' म्हटले आहे. खरे म्हणजे तुम्ही दूधमिश्रित पाण्यातून दूध बाजूला काढणारे 'राजहंस' आहात. 'रत्नपारखी'पेक्षा 'राजहंस' मोठा. मंगेश पाडगावकरांनी तुम्हाला 'उत्कृष्ट वक्ते' म्हणून संबोधले आहेच. पण तुम्ही उत्तम श्रोतेही आहात. तुमच्या लेखकांना वाटते की, त्यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी तुम्ही यावे. तुम्ही न आला तर त्यांना वाईट वाटते, आणि आलात तर मात्र काहीशी भीती वाटते.

आपण म्हटले आहे - 'मी हाडाचा संपादक-प्रकाशक आहे. कोणा नव्या लेखकानं लिहिलेल्या चार गुणवान ओळी जरी वाचनात आल्या, तरी त्याच्याकडून तीनशे पानांचं पुस्तक लिहून घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.' हे नवीन, गुणवान लेखकाला स्फूर्ती देणारे आहे. तुमची दृष्टी जुन्या, प्रस्थापित व प्रतिष्ठित लेखकांऐवजी नव्या लेखकांना शोधण्याची व त्यांना पुढे आणण्याची असते. प्रकाशनासाठी ग्रंथ निवडताना स्वत:च्या विचारप्रणालीचा त्यावर परिणाम होणार नाही, याची तुम्ही घेत असलेली काटेकोर दक्षता 'राजहंस'चे वैशिष्ट्यच बनलेले आहे.

तुमची वैयक्तिक पत्रे जिव्हाळा व विचार यांनी भरलेली आहेत. ती छापली नसती, तर आम्हांला कळलीच नसती. ती लेखकांना लिहिलेली असतील, तर ती त्यांचा उत्साह वाढवणारी आहेत. लेखकांच्या नव्या ग्रंथासोबत पेढ्यांचा पुडा, चेक व पत्रही पाठवून देणे; जमल्यास स्वत: घेऊन जाणे हे 'राजहंस'च करू शकतात. यामुळे माझे पुस्तक चांगले असल्यामुळे हे पेढे आले आहेत, असा काही जणांचा गैरसमज झाला असल्यास तोही दूर होईल.

'पुस्तक वाचण्यापेक्षा माणसं वाचणं मला जास्त आवडतं.' हे तुमचं विधान वाचून अनेक लेखक आपल्याला तुम्ही कसे 'वाचले' असेल म्हणून विचारात पडले




ही आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची,
भौगोलिक तसेच मानसिकही.
हेतू, साधने आणि साध्य
काहीही असो, आहे कमालीची आनंददायी
आणि चिंतनगर्भ.

आनंदाच्या दाही दिशा

एक मुक्त प्रवास

डॉ. आरती रानडे


किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ४०)

असतील! 'मी लिहिलेच, तर व्यक्तिचित्रे लिहीन' असे तुम्ही म्हणता, कारण त्यात 'माणूस' शोधायचा असतो. तुमच्या या दोन ग्रंथांपैकी अधिक चांगला कोणता, याचे उत्तर कोणासही देता येणार नाही. कारण दोन्हींतही 'माणूस' एकच आहे. 'माणूस' साप्ताहिक बंद पडले असले, तरी ते अशा प्रकारे 'राजहंस'मध्ये विलीन झालेले आहे. अंबरीश मिश्र यांच्या लेखातील पुढील विधाने लक्षणीय आहेत : 'माजगावकर हे प्रकरण वाटतं तितकं सोपं नाहीये. ते शांत स्वभावाचे नि निगर्वी, मनमिळाऊ आहेत. आपल्या लेखकाची शक्य ती काळजी घेतात हे खरं; पण मनाचा थांग लागू देत नाहीत हेही खरं... ही कीप्स यू गेसिंग.'

तुमच्यावरील सर्वच लेख चांगले आहेत. पण त्यातही दत्तप्रसाद दाभोळकर व मंगला आठलेकर यांचे लेख फारच उत्तम आहेत. श्री. पु. भागवत यांच्या पत्राचा (विषयाशी संबंध नसला तरी) ग्रंथात समावेश केला, हे फार चांगले झाले. त्यामुळे श्री.पुं.चे दर्शन झालेच, पण काही अन्य नव्या गोष्टी कळल्या.

तुमची सर्वच भाषणे नेमकी व परिणामकारक आहेत. परंतु त्यातही विनायकराव पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त केलेले भाषण अतिशय उल्लेखनीय आहे. ते एकदा नाशिकला आमच्या व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. पण ते किती मोठे आहेत, हे आम्हाला माहीतच नव्हते. त्यामुळे त्यांची अधिक ओळखही करून घेतली नव्हती. तुम्ही लिहिलेल्या लेखांतील मनाला चटका लावून जाणारा लेख म्हणजे अनिल बर्वेसंबंधीचा. वयाच्या केवळ छत्तिसाव्या वर्षी इहलोक सोडून गेलेल्या, तो जाऊन आता तीस वर्षांहून अधिक काळ लोटलेल्या व काहीसा नक्षलवादी विचाराकडे झुकलेल्या अनिलवर तुम्हाला इतका चांगला लेख लिहावासा वाटला, यातून अनिलच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतोच, परंतु 'माणूस' शोधण्याच्या


ले. जनरल एसपीपी थोरात, ॲडमिरल भास्करराव सोमण,
फील्डमार्शल सॅम माणेकशा, ले. जनरल प्रेम भगत,
ले. जनरल सगतसिंग आणि ले. जनरल पंकज जोशी.
भारतीय सैन्यदलातील पराक्रमाची सहा उत्तुंग शिखरे!
त्यांच्या अमर कर्तृत्वाच्या या स्फूर्तिदायक कहाण्या...





दुर्दम्य
भारतीय सैन्यनेतृत्वाची उत्तुंग शिखरे

मेजर जनरल शशिकांत पित्रे (निवृत्त)

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ४०)

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके



ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची. ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी अपघातानं ती एक चूक करते. पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं. यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडतो का? परतीची वाट सापडते का?

### डोईचा पदर आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ४०)


बेर्डेंमधला लेखक - दिग्दर्शक - चित्रकार - नेपथ्यकार - पार्श्वसंगीतकार - जाहिरात कलाकार - वाद्यवृंदकार कसा घडत गेला, नावारूपाला आला याची ही प्रेरणादायक कहाणी. कोकणच्या अंत:स्पंदनांची रम्य स्मरणयात्रा.

### हिरवी पोर्ट्रेट्स

पुरुषोत्तम बेर्डे

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ४०)





भयकंपित करणारे बदल अन् बाजारीकरणातून निर्माण झालेल्या शोषणाच्या नवनव्या तऱ्हांनी बरबटलेला जडशीळ भोवताल पेलता पेलता घायाळ झालेला समकाळ म्हणजे ‘खांदे सुजलेले दिवस’ हा कवितासंग्रह.

### खांदे सुजलेले दिवस

अशोक कोतवाल

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ४०)

तुमचा दृष्टिकोनही प्रकर्षाने दृष्टीस पडतो. 'माणूस' आणि 'सोबत' ही आमची विद्यार्थिदशेतील आवडती साप्ताहिके. 'माणूस'मधील अनिलचे त्या वेळी लेख वाचले होते. परंतु नंतर आम्ही ते विसरून गेलो. या एका विलक्षण व प्रतिभाशाली व्यक्तिमत्त्वाची तुम्ही या लेखाने आठवण करून दिली, हे फार चांगले झाले.

'राजहंस'च्या कोणत्याही ग्रंथापेक्षा या ग्रंथांची निर्मिती अधिक उत्तम राहणार, हे तर अपेक्षितच होते. फक्त एक कमतरता राहून गेली आहे, ती म्हणजे या ग्रंथांत शेकडो नामवंतांची नावे आहेत व त्यासाठी या ग्रंथांना व्यक्तिनाम-सूचीची नितांत आवश्यकता होती. पुढील आवृत्तीत तिचा अवश्य समावेश करावा.

अशा या 'राजहंस'चे आपण एक लेखक आहोत, याचा आम्हाला अभिमान वाटतो. आपणास दीर्घायुष्य चिंतितो.

आपला स्नेहांकित.

***शेषराव मोरे***





वाचकाला मनाने, ज्ञानाने अधिक समृद्ध बनवणारी
मिस्कील शैलीतली साहित्य, कला, संगीत
यांची खुमासदार मैफल!

सांगतो ऐका...

मनोहर पारनेरकर

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ४०)



'एका दिशेचा शोध' हे संदीप वासलेकरांचं पुस्तक
इतकं गाजलं की, बारा वर्षांत निघाल्या चोवीस आवृत्त्या!
सुधारून वाढवलेली, **रौप्यमहोत्सवी आवृत्ती!**
यात अद्ययावत माहितीसह वाढवलीत तब्बल १२० पानं!

एका दिशेचा शोध

संदीप वासलेकर

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ४०)




## खास बालवाचकांसाठी लिहिलेली 'राजहंसी' पुस्तके

मागवा खालीलपैकी १ पुस्तक किंवा ३ पुस्तके - ट.ख. ४०/-




उत्साह देणाऱ्या दिवसाला पाहून अंधाराला काय वाटतं? वर्षानुवर्षं एकाच जागी साचलेल्या तळ्याचं आयुष्य कसं आहे? जंगलं कमी झाल्यामुळे घर हरवलेल्या प्राण्यांना काय वाटतं? पशू-पक्षी संपावर गेले तर काय होईल? या कविता वाचून अशा प्रश्नांची काय उत्तरं मिळतायत पाहू या-

### प्रेम करू या पृथ्वीवर

वर्षा गजेंद्रगडकर


किंमत : ₹ १२०/-


भारतीय विद्यापीठातून विज्ञान विषयातली डॉक्टरेट मिळवणाऱ्या पहिल्या महिला. ज्या काळात विद्यापीठात प्रयोगशाळांमधल्या सुविधा अपुऱ्या होत्या; त्या काळात अपार कष्ट घेत, स्वत: पदरमोड करून औषधी वनस्पतिशास्त्राच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन करणाऱ्या वैज्ञानिकेची प्रेरक कहाणी.

### कर्मयोगिनी वैज्ञानिक असीमा चटर्जी

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ ८०/-




महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास अनेक थोर व्यक्तींच्या कर्तृत्वामुळे घडला आहे. पराक्रम, चातुर्य, धाडस, मुत्सद्देगिरी, वैज्ञानिक दृष्टी असे विविध गुण असलेल्या या व्यक्ती म्हणजे इतिहासातील रत्नेच! वाचू या त्यांच्या स्फूर्तिदायक गोष्टी.

### इतिहासातील रत्ने

कविता भालेराव

किंमत : ₹ ५०/-



# चित्र पाहीन आवडी

## रंग शिंपणारे चित्रकार

रंग विविध प्रतलांवर लावण्याच्या नानाविध पद्धती वेगवेगळ्या काळांत अस्तित्वात आल्या. अगदी आदिमकाळात हाताने रंग लावण्यापासून ते कॉम्प्रेसरने हवेच्या दाबाचा फायदा घेऊन रंग 'स्प्रे' करण्याच्या यंत्रयुगातील पद्धतीच्या मधल्या काळात अनेक पद्धतींनी रंगलेपन केले गेले. रंग शिंपणे, हे त्यातील एक तंत्र. रंग शिंपण्याने विविध चित्रांत साधलेले परिणाम प्रथमदर्शनी एकच वाटत असले, तरीही उद्देश्य मात्र स्थल-कालसापेक्ष वेगळे होते. त्याचे संदर्भ बदलले, की रंग शिंपण्याच्या परिणामांचा उपयोग चित्रकार कसा करून घेत असतो याचा अंदाज येतो. त्याची मजा घेता येते.

**'पंजेप्रतिमा'**

आदिमकाळात मानवाने आपल्या खाणाखुणा ठेवताना आपला हाताचा पंजा भिंतीवर - दगडावर ठेवून त्याभोवती तांबडा रंग शिंपून अनेक 'पंजेप्रतिमा' तयार केल्या आहेत. सर्वसाधारण चूळ भरतात तसे, तोंडात रंगद्रव्य घेऊन तोंडाने रंग शिंपून पंजे असलेल्या अनेक प्रतिमा आदिमकाळातील उपलब्ध आहेत. गुरुत्वाकर्षणाच्या तत्त्वाला आव्हान देत जोर लावून विधीचा भाग म्हणून चित्रकार मंडळी तोंडातील हवेच्या दाबचा फायदा घेत हा रंगशिपणीचा प्रकार प्राचीन जगतात करीत असत. आजही काही जनजातीकलेत हा प्रकार दिसून येतो. ह्याचा उद्देश्य 'आपले अस्तित्व मागे ठेवणे' असा असावा, असे मत पुरातत्त्वज्ञ मधुकर केशव ढवळीकर यांनी नोंदवले आहे. मंगळावर पोचू पाहणाऱ्या मानवी विकासाच्या आधुनिक काळात आजही गृहप्रवेश पूजाविधीत हातांचे ठसे कुंकवात बुडवून भिंतीवर उमटवले जातात आणि समाजमानसात हे ठसे शुभचिन्ह मानले जाते.

**युद्धप्रसंग**

रंग शिंपण्यामुळे मिळणाऱ्या दृश्यप्रतिमांचा वापर आणि ह्या तंत्राचा लाभ घेणे, हे मध्ययुगीन काळात दिसून येते. लघुचित्रे (मिनीएचर) आणि पोथीचित्रात सर्वस्वी वेगळ्या संदर्भात रंग लावण्यासाठी ही पद्धत वापरलेली दिसते. मध्ययुगात तयार झालेल्या चित्रांपैकी प्रामुख्याने युद्धाच्या चित्रात 'रक्त सांडले आहे' असे चित्रात दाखवण्यासाठी आपल्याकडे लाल रंग शिंपडला की काम भागते, असे कधीतरी चित्रकार मंडळींच्या लक्षात आले असणार. मग ही लाल रंग शिंपून रक्तपात दाखवण्याची रीत



प्रचलित झाली. ‘रामायण-महाभारत’ युद्धाची लघुचित्रे किंवा ‘भागवत’ पोथीचित्रातील देव-दानव युद्धप्रसंगात अशी रंगशिंपणी वारंवार वापरलेली दिसते. त्यामुळे अपेक्षित परिणाम साधला गेला आहे, ही बाब येथे लक्षात घेता येते.

## रंगपंचमी

विशेष अपेक्षित परिणाम साधण्यासाठी रंग शिंपावाच लागतो. ब्रश किंवा इतर पद्धतीने केलेल्या रंगलेपनाने असे दृश्य परिणाम साधत नाहीत, तर शिंपूनच साधतात. याचे आणखी एक उदाहरण म्हणजे ‘कृष्णलीला’ विषयावरील चित्रात रंगपंचमी दाखवताना ही पद्धत बखुबीने वापरली आहे, असे दिसते. पिचकारीतून रंग उडवताना होणारी रंगांची उधळण दाखवताना ह्या पद्धतीचा चपखल वापर केलेला दिसतो. राधा-कृष्ण आणि गोप-गोपिका रंगाने भरले आहेत. हवेत रंग उधळला आहे, असे दाखवताना ब्रशमध्ये रंग घेऊन बोटाने ब्रशला थोडा धक्का मारला की चित्रावर असे परिणाम आणण्याची क्लृप्ती मध्ययुगीन चित्रकारांनी शोधली होती आणि ह्या तंत्राचा यथोचित वापर केला होता. हे उत्तमच आहे. चित्रे पाहताना आपण अशी तंत्रे शोधू शकलो की त्यात रमत जातो, चित्र-तपशील उलगडत जातो.

अर्थात हा तंत्राचा वापर काही विषय-प्रसंग-घटना दाखवण्यासाठी करणे आणि स्वतंत्र कलाभिव्यक्ती म्हणून करणे वेगळे, ही बाब लक्षात घेणे येथे महत्त्वाचे ठरते. आता आपण हे तंत्र समोर ठेवून, या संदर्भात भारतातून अमेरिकेत जाऊ.

## चित्रकार जॅक्सन पोल्याक

सुप्रसिद्ध अमेरिकन चित्रकार जॅक्सन पोल्याक ह्याने रंग शिंपडण्याबाबत केलेले प्रयोग उल्लेखनीय आहेत. त्याने चित्रे रंगवताना आजूबाजूला पडणारे रंगांचे ठिपके



चित्रकार राजाराम होले

काळजीपूर्वक पाहिले आणि त्या अपघाताने येणाऱ्या परिणामांचा वापर हुशारीने आपल्या चित्रात केला. त्याची चित्रपद्धत प्रथमदर्शनी साधी-सोपी वाटली, तरी त्यावर विश्वास ठेवून सतत त्या ‘अमूर्त’ कलास्वरूपाची निर्मिती करणे तसे आव्हानात्मक असते. पुढे कलाइतिहासाने त्याची दखल अमेरिकन ‘कलर-फील्ड-आर्ट’ ह्या सदरात घेतली. शुद्ध स्वरूपातील अमूर्त चित्रे पाहायची असतील, तर जॅक्सन पोल्याकची कला पाहावी. ‘पोल्याक’ नावाने त्याच्या चित्रकारकिर्दीवर एक इंग्लिश चित्रपटदेखील आहे. ह्या अमूर्त कलाप्रवाहाला अमेरिकी सरकारने पुरस्कृत केले आणि राजकीय हेरगिरीसाठी वापर केला आणि ‘रॉ’सारख्या संस्थांनी त्याचा शक्य तितका राजकीय फायदा उठवला.

पोल्याकचा हा चित्रविधी तसा सोपा... एक कॅनव्हास जमिनीवर पसरावा, त्यावर मनाप्रमाणे रंगाची निवड करून काठीच्या साहाय्याने प्रवाही रंग शिंपावेत. कॅनव्हासभोवती मनसोक्त फिरावे. मग दुसरा रंग, तिसरा रंग... हे असेच चालू ठेवावे. मधून अधून काय होते आहे याचे भान ठेवावे आणि शेवटी आवडेल तो भाग चित्र म्हणून प्रदर्शित करावा. हे करताना मनगट, हात, खांदा, कंबर, पाय अशा सर्वच भागांचा वापर केला जातो. कारण त्याशिवाय रंग शिंपता येत नाहीत. म्हणून जॅक्सन पोल्याकच्या चित्रकामाला ‘ॲक्शन पेंटिंग’ असे नामकरण मिळाले. नेहमीची चित्रे काढताना ईझलसमोर उभे राहून मनगट, पंजा, संपूर्ण हात वापरून चित्रे होतात; परंतु इथे आपल्याला संपूर्ण शरीर कसरतीसारखे वापरूनच परिणाम साधावा लागतो.

जॅक्सनसारखे हे रंग शिंपणारे चित्रकार साहसी म्हणावे लागतील. चित्रकलेत नवी प्रतिमा तयार करणे फारसे सोपे नसते. चित्रे करताना हे रंग शिंपणारे चित्रकार

स्वत:च्या वैचारिक प्रक्रियेवर दृढ विश्वास ठेवताना दिसतात. पाहणाऱ्याने अशा चित्रात अपघाताने येणाऱ्या रेषांचा, रंगांचा आणि पुनरावृत्तीचा आस्वाद घ्यावा. केवलाकारी चित्रे पाहायला रसिकाने स्वत:ला तयार करावे लागते हा भाग वेगळा. आता परत भारतात येऊ या.

**चित्रकार राजाराम होले**

मुंबईत राहत असलेल्या चित्रकार राजाराम होले यांना जॅक्सन पोल्याकच्या फाउंडेशनने अभ्यासवृत्ती देऊन त्यांच्या कलेचा गौरव केला. होले रंग शिंपतात, परंतु वेगळ्या पद्धतीने ठिपक्यांच्या रूपात. हे ठिपके राजारामच्या चित्रात ग्रह-गोल होतात. एखादा ठिपका तेजोमय ग्रह-गोल; तर एखादा भास्कररूपात गगनराज होतो, संपूर्ण गगन तेजाने झगमगून जाते आणि होलेच्या संपूर्ण चित्रावकाशात जणू आकाशगंगाच अवतरते. होले यांच्या चित्रांची समकालीन कलाजगात नोंद घेतली गेलेली आहे आणि अनेक लिलावांत होलेंची चित्रे मोठ्या किमतीला विकली जात आहेत. अशी ही अनोखी दुनिया रंग शिंपणाऱ्या चित्रकरांची...

***नितीन हडप,*** ९३७२४१८६१५


आत्मचरित्रांमध्ये मानदंड ठरलेले, एके काळच्या गाजलेल्या अभिनेत्रीचे हे आत्मकथन. साध्या, प्रवाही भाषेतले, पण आजच्या काळातही सर्वांना सिनेमा लाइनचे वास्तव सांगणारे...

सांगत्ये ऐका

हंसा वाडकर

आवृत्ती पंधरावी । किंमत : ₹ १००/- । (ट.ख. ₹ ४०)




अनेक कृष्णधवल चित्रांसह बहुरंगी चित्रे, दलालांवर लिहिलेले मान्यवरांचे लेख, दलालांनी व त्यांच्या समकालीन चित्रकारांनी कालक्रमानुसार काढलेली चित्रे. हे सर्व समाविष्ट असलेले...



चित्रकार दीनानाथ दलाल :
चित्र आणि चरित्र

सुहास बहुळकर

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ६०)




# असे जन्मले पुस्तक!

## शब्द सूर
## जपून ठेव...

‘शब्द सूर जपून ठेव...’ हे माझं राजहंसकडचं पहिलंच पुस्तक. पण याची जन्मकथा सांगायची, तर बरंच मागं जावं लागेल. माझी आई अतिशय सुंदर गायची. मॉडर्न हायस्कूलमध्ये ती अनेक वर्षं विद्यार्थ्यांची लाडकी संगीत शिक्षिका होती. दादा उत्तम तबला वाजवत असे. मावशी-मामी-मावसबहिणी सगळ्या उत्तम गायिका किंवा अभ्यासक. शास्त्रीय संगीताची बैठक अशी घरातच असल्यामुळे माझ्यावर गाण्याचे संस्कार झाले नसते तरच नवल. आई लहानपणी अनेक मैफिलींना बरोबर घेऊन जायची. तिच्याबरोबर वर्षातून दोन कार्यक्रमांत (तेही दिव्यांग किंवा अंध मुलांच्या संस्थांमध्ये) मीही साथ द्यायचे. त्यातून तिनं मला गाण्याकडे बघायची ‘डोळस’ आणि ‘चौकस’ नजर बहाल केली. माझा मूळचा पिंड हा गाण्याचा (performer) नसून अभ्यासाचा (academics) आहे, हे तिच्या लक्षात आलं होतं. त्यामुळे माझं ‘गाणं’ शिकणं केव्हाच थांबलं होतं, पण गाणार नसलीस तरी ‘कानानं आणि मनानं ऐक’ असं तिचं टुमणं सुरू असायचं. त्यात बाबांनी जुन्या हिंदी गाण्यांची, दादानं गझलांची, मित्र-मैत्रिणींनी नव्या संगीताची ओळख करून देत माझे कान चांगल्या अर्थानं ‘भरले’. पण त्या वेळी कुणी मला ‘तू यावर उद्या पुस्तक लिहिशील’ असं म्हणलं असतं, तर मी चक्क त्याला वेड्यात काढलं असतं.

पुढे कॉमर्सची वाट धरत मी कंपनी सेक्रेटरी, एलएलबी झाले; स्वतंत्र प्रॅक्टिस, सांसारिक व्यवधानं यात बुडून गेले. त्यातही शास्त्रीय संगीत कुठेतरी सतत सोबतीला होतं, त्यावर विचार सुरू होते. एकच राग वेगवेगळ्या वेळी ऐकून बघितला, वेगळ्या शैलींमध्ये ऐकला तर तो कसा वाटतो? गाताना आणि वाजवताना हा राग कसा ऐकू येतो? शास्त्रीय संगीताचं आणि रोजच्या जगण्याचं काही नातं असेल का? मग रागावर आधारित हिंदी-मराठी गाणी,





किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ४०)

नाट्यसंगीत, गझल ऐकण्याचा मग छंदच जडला. तरीही मला सगळ्यात जास्त जी गोष्ट खुणावत असे, ती म्हणजे रागातला भाव किंवा रस. रागाला स्वत:चं असं एक व्यक्तिमत्त्व असतं आणि माणसांसारखेच त्याचेही मूड्स बदलत असतात यावर माझा विश्वास बसत चालला होता.

अशीच एक दिवस ऑफिसला जाताना भटीयार ऐकत गेले... 'पूरबसे सूर्य उगा'मधला भटीयार आणि जसराज गातात तो 'कोई नही है अपना'मध्ये किती परस्परविरोधी भाव आहेत! मनात काहीबाही उमटत गेलं आणि मी गाडी साइडला घेऊन तिथेच ते लिहून फेसबुकवर पोस्टही केलं. त्याला उदंड प्रतिसाद मिळाला. हे अजिबात 'टेक्निकल' न वाटता रोजच्या जगण्यातलं, सहज वाटतंय असं खूप जणांनी सांगितलं. मग त्यावर मालिकाच लिहायला घेतली, पण त्याचदरम्यान बाबा गेले आणि त्यांच्या आवडत्या रागावरची - यमनवरची पोस्ट लिहून मी थांबले. पुढे काही सुचेना. तोवर खूप जणांनी याचं पुस्तक करावं, असं सुचवून झालं होतं. पण म्हणतात ना, योग यावा लागतो.

जवळजवळ दोन वर्षं गेली. 'राजहंस'च्या शेवाळकर काकांना मी एका वेगळ्याच कारणासाठी फोन केला होता, त्यादरम्यान त्यांना मी जरा घाबरत-घाबरतच या लेखमालेविषयी सांगितलं आणि पुस्तक करता येईल का विचारलं. त्यांनी बोरसे सरांशी बोलून कळवतो सांगितलं. राजहंस, माजगावकर सर, डॉक्टर बोरसे अशी मोठी नावं समोर असून माझ्यासारख्या नवख्या लेखिकेनं खरं तर हे फार मोठं धाडसच केलं होतं. पण दोन आठवड्यांनी बोरसे सरांनी पुन्हा भेटायला बोलावलं आणि 'करू या हे पुस्तक, कंटेंटमध्ये मला काहीही बदल अपेक्षित नाहीत, उलट हवं असेल तर आणखी लिहा' असं सांगितलं, तेव्हा मी स्वत:लाच एक चिमटा काढून पाहिला. लेखमालेत भर घालत, आवश्यक ते बदल करत एकूण पन्नास रागांवरचे ललित

मराठी गझलेच्या प्रदेशात मध्यरात्रीही तळपळणारा सूर्य म्हणजे सुरेश भट! त्या भटांचे गंडाबंध शागिर्द म्हणजे दीपक करंदीकर. त्यांना लाभला गुरूंचा सोनेरी सहवास. त्यातून साकारलेले –

गझलसम्राटाच्या सहवासात

दीपक करंदीकर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ४०)

बंध लिहून झाले. पुस्तकाच्या शेवटी रागांवर आधारित गाण्यांची सूची देणं, क्यूआर कोडद्वारा प्रत्येक रागाचा परिचय देणारी ऑडिओ क्लिप देणं, मुखपृष्ठ साकारताना, पुस्तकाचं नामकरण करतानाही लेखकाची आणि वाचकांची भूमिका यांचा मेळ घालणं हे 'राजहंसी' संस्कार झाल्यामुळे एक देखणं पुस्तक आकाराला आलं.

हे पुस्तक प्रकाशित व्हायचं होतं, त्यादरम्यान मावशी (वि. माणिक भिडे) गेली. आईला जाऊन नुकतंच वर्ष झालं होतं (मी हे पुस्तक तिलाच अर्पण केलं आहे); पण दोघींचा आशीर्वाद माझ्यासाठी कायम आहेच, याची प्रचिती मला कायम येत असते. माझी मावसबहीण विदुषी डॉ. अश्विनी भिडे-देशपांडे हिनं यातले लेख मावशीला वाचून दाखवले होते. दोघींनीही अतिशय प्रेमानं आणि कौतुकानं यांचं पुस्तक करच, असा आग्रह धरला होता; म्हणून मी हे पाऊल उचलू शकले हे मी कधीही विसरू शकणार नाही. माझी चुलतबहीण सावनी शेंडे हिनं अक्षरश: एका मेसेजवर स्वत:च्या हस्ताक्षरात पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिली. या दोन्ही ठेवी माझ्यासाठी अमूल्य आहेत. पण अगदी अनोळखी, दूरस्थ वाचकांच्या प्रेमानं प्रतिक्रिया येतात तेव्हा कधीकधी थक्क व्हायला होतं. अमेरिकास्थित असलेल्या, डिप्रेशनमधून जाणाऱ्या मुलीच्या बाबांनी, 'ती रोज एक लेख वाचते, गाणी ऐकते आणि तिचा दिवस आनंदात जातो, तुमचे आभार' असं कळवलं, तेव्हा मलाच भरून आलं. म्युझिक थेरपीचा क्लास घेणाऱ्या एका ताईंनी 'तुम्ही ललतचे दोन मध्यम सांगताना अंधार-प्रकाशाचा खेळ म्हणलं, हे तेच तत्त्व आम्ही थेरपीत वापरतो' असं सांगितलं, तेव्हा आश्चर्याचा सुखद धक्का बसला. कित्येक जणांनी 'आम्हाला शास्त्रीय संगीतातलं कळत नाही, पण तुझं पुस्तक वाचलं आणि आता गाणं ऐकावं / शिकावं वाटतंय' असं सांगितलं, तेव्हा मला हे पुस्तक लिहिण्यामागचा उद्देश सफल झाला असं खरंच वाटलं. संगीतात किती ताकद असते आणि आपली लेखणी कुणाला काय देऊन


समीक्षकांपासून रसिकांपर्यंत, 'पेन'सेनांपासून
'कान'सेनांपर्यंत साऱ्यांना सहप्रवासी बनवणारी;
संगीताची नवी उमज आणि नवी समज करून
देणारी एक सांगीतिक यात्रा!

गान गुणगान
एक सांगीतिक यात्रा
सत्यशील देशपांडे



आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ४०)

जात असते, काही सांगता येत नाही. असे क्षण हात लिहिता ठेवायची ऊर्जा देतात. लेखकाला आणखी काय हवं असतं?

शास्त्रीय संगीत हा विशाल महासागर आहे, त्यामुळे सगळंच काही शब्दात पकडता येणं शक्य नाही. सगळे भावप्रदेश हातात येणंही शक्य नाही. पण या निमित्तानं एका वेगळ्या विषयाला हात घालता आला आणि शब्द-सुरांना जपून ठेवण्याच्या या प्रयत्नात वाचकांची, राजहंसच्या समर्थ टीमची साथ मिळाली, याबद्दल मी कायम ऋणी राहीन.

इति लेखनसीमा!

***नेहा लिमये***



अलीकडे अनेक तरुण-तरुणी अमेरिकेत स्थायिक झालीत. निरनिराळ्या कारणांनी तिथे गेलेले त्यांचे पालक अगदी वेगळ्या जीवनशैलीला सामोरे जातात. सहयोग, सहवास, सहजीवनाने त्यांचा आनंद द्विगुणित होतो. सुखदु:खाच्या हिंदोळ्यावर झुलणाऱ्या प्रेमी युगुलांची कहाणी सांगणारी ही अनोखी कादंबरी.



संधिप्रकाश

ज्योत्स्ना विद्याधर लेले

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ४०)



त्यानं मातीतून रंग शोधले... शेंगदाणा-रताळ्यापासून चिकन-शाई-कॉफी-साबण-कागद बनवले... सोयाबीनपासून मोटारींसाठी सुटे भाग घडवले... असा हा मुलखावेगळा कार्व्हर या पुस्तकातून तुम्हांला भेटेल.

किमयागार कार्व्हर

वीणा गवाणकर । चित्रे : माधुरी पुरंदरे

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ४०)



# आठवणींच्या खिडकीतून

श्री. जब्बारस्वामी पटेल

## लाँग - मिड - मिड क्लोज - क्लोज - टाइट क्लोज

सांगली-मिरजेमधून मी पुण्याला आलो ते नाटक, सिनेमा, तमाशा, संगीत या वेडामुळे! कॉलेजशिक्षण हा केवळ बहाणा होता. राष्ट्रसेवादल कलापथकाने सादर केलेलं 'बिनबियांचे झाड' हे व्यंकटेश माडगूळकर यांनी लिहिलेलं वगनाट्य आणि १९५९मध्ये साहित्य संमेलनात पुण्याच्या 'प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन'नी (पी. डी.ए.) सादर केलेलं प्रा. वसंत कानेटकर यांनी लिहिलेलं, प्रा. भालबा केळकर यांनी दिग्दर्शित केलेलं आणि डॉ. श्रीराम लागू यांच्या प्रमुख भूमिकेतलं 'वेड्याचं घर उन्हात' हे नाटक! मी पार झपाटून गेलो होतो. मी सरळ पुणं गाठलं. शिक्षणाचे तीन तेरा केव्हाच वाजलेले होते. मग नाटकं, सिनेमे, तमाशा, वसंत व्याख्यानमाला, सवाई गंधर्व यांनी पछाडून सोडलं. आणि पुण्याला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'पुरुषोत्तम करंडक' ही एकांकिका स्पर्धा सुरू झाली. माझ्यासाठी ही पर्वणीच! प्रत्येक एकांकिका मी फर्ग्युसन कॉलेजच्या ॲम्फी थिएटरमधल्या गॅलरीत बसून सर्वांगाने बघत होतो. बी. जे. मेडिकल कॉलेजनी केलेली, शं. ना. नवरे यांनी लिहिलेली, दोनच पात्रं असलेली 'जनावर' ही एकांकिका पाहून तर मी बेहद्द खूश! त्यातला तो सडसडीत बांध्याचा, अत्यंत चपळाईनं रंगमंचावर वावरणारा तरुण पाहून मी चक्रावलोच. दिग्दर्शन त्यानं केलं होतं. नाव कळलं - जब्बार पटेल! हे माझं जब्बारचं पहिलं दूरदर्शन! लाँग शॉटमधलं पहिलं दर्शन!

मी पी.डी.ए.चं प्रत्येक नाटक आवर्जून बघत होतो. जब्बार त्यात काम करीत होता. 'खून पाहावा करून', 'तू वेडा कुंभार', त्यानेच दिग्दर्शित केलेलं विजय तेंडुलकरांचं 'लोभ नसावा' हे बी. जे. मेडिकलच्या आर्ट सर्कलनं सादर केलेलं नाटक. प्रत्येक वेळी वाटायचं, पी.डी.ए.मध्ये प्रवेश मिळाला पाहिजे आणि जब्बारबरोबर ओळख झाली पाहिजे.

शिक्षणात अजिबात 'रस' नसलेला मी अखेर 'विद्या महामंडळ' या नवीनच स्थापन झालेल्या (आता 'लक्ष्मणराव आपटे प्रशाला आणि कनिष्ठ महाविद्यालय') माध्यमिक शाळेत शिक्षक झालो. पक्का शिक्षक होण्यासाठी 'टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन'मध्ये बीएडसाठी प्रवेश घेतला. त्या ठिकाणी प्रा. भालबा केळकरांचे उजवे हात म्हणजे श्रीधर राजगुरू एमएड करत होते. त्यांच्या दिग्दर्शनाखाली मी 'सफाई'

ही एकांकिका, 'त्राटिका' आणि 'माझे घर' ही नाटकं केली. त्यांच्या लक्षात आलं, 'हा रानडे, नाटकाच्या वेडानं पार झपाटलेला आहे. त्याच दरम्यान पी.डी.ए.नं विजय तेंडुलकर लिखित आणि जब्बार पटेल दिग्दर्शित 'अशी पाखरे येती' हे नाटक राज्य-नाट्यस्पर्धेत सादर केलं आणि त्याच्यावर बक्षिसांची खैरातच झाली. जब्बारनं तर सिक्सरच मारलेला आणि त्याच्या या कामगिरीसाठी मी कौतुकानं टाळ्या वाजवणारा! पण अजून काही भेटीचा आणि बोलण्याचा योग येत नव्हता. 'जब्बार' या साखरेच्या पोत्याभोवती पी.डी.ए.मधली तरुण पोरंपोरी मुंगळे-मुंग्यांसारखी चिकटलेली असतात, अशा वार्ता दूरवरून श्रवणी येत होत्या.

आणि एके दिवशी अचानक अण्णा (श्रीधर) राजगुरूचा सांगावा आला - 'जब्बार राज्य-नाट्यस्पर्धेसाठी तेंडुलकरांचं नवीन नाटक बसवतोय. तुला जर काम करायची इच्छा असेल, तर उद्या गरवारे प्रशालेच्या हॉलमध्ये संध्याकाळी ७.३० वाजता ये.' धाडस करून गेलो. 'काहीतरी म्हणून दाखवा' असं मला सांगणारं जब्बारचं पहिलं वाक्य! मी तोवर निळू फुले यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे शहर राष्ट्रसेवादल कलापथकात समूहगीतं, लोकगीतं, वगनाट्यांत काम करत होतो. प्रा. वसंत बापटांनी लिहिलेल्या 'संयुक्त महाराष्ट्राचा पोवाडा'मधील काही भाग कानावर हात ठेवून माझ्या बेसूर, भसाड्या आवाजात म्हटला आणि आलो घरी. पुरुषोत्तम करंडकच्या स्पर्धेच्या निमित्तानं सतीश आळेकर आणि सुरेश बसाळे भेटले आणि त्यांनी सांगितलं, ''जब्बारनं तुझी निवड केली आहे. लवकरच 'घाशीराम'च्या तालमी सुरू होतील.''

'घाशीराम कोतवाल'च्या त्या तीन महिन्यांच्या तालमी मी विसरू म्हणता विसरू शकत नाही. सुरुवातीला प्रत्येक वाक्यावर अडणारा मी स्टँडिंग रिहर्सल्स सुरू झाल्यावर; मासा जसा सहज पाण्यात पोहू लागतो, तसा पोहू लागलो. 'माझ्या नानाचं लगीन' हे गीत बसवत असताना मी घेतलेली गिरकी आणि त्याला जब्बारनं दिलेली दाद आजही ताजी टवटवीत आहे. तालीम संपवून घरी जाताना संभाजी पुलाजवळ जब्बारनं -

गौरी गेली, नाना राहिले<br>
घाशीराम कोतवालाने<br>
गौरीवियोगाचे दुःख<br>
काळजात ठासले

हे अभिनयासकट शिकवलेलं गीत मी कसा विसरू? गुडलक चौकात 'राम्या, आता तुला सूत्रधाराचा सूर बरोब्बर गवसला आहे. गो अहेड! मधनं मधनं मला वाटतील त्या सूचना मी करेनच.' असं जब्बार म्हणाला.

'घाशीराम'नंतर वादळ उठलं आणि २७ मार्च १९७१ रोजी जागतिक रंगभूमीच्या दिवशी 'थिएटर ॲकॅडमी' या प्रायोगिक नाट्यसंस्थेची स्थापना झाली आणि हा

घाशीराम जागतिक पातळीवर गाजला, ही सर्व सत्यकथा (दंतकथा नाही) सकळांना ठाऊक आहेच.

या काळात जब्बारकडे (आता आपल्या लक्षात आलं असेलच की 'ए जब्बार, ए राम्या, ए मोहन, ए अण्णा, ए सतीश, ए रम्या अशा 'अरे-तुरे'च्या भाषेत एकमेकांना हाकारू लागलो - वयाचा, दर्जाचा काहीही संबंध नाही. 'ए आई' असं आपण म्हणतो ना?) 'सामना' चित्रपट दिग्दर्शनासाठी आला. जब्बारमुळे पडद्यावर दिसलो. शूटिंग होतं जामखेडला. आमचा साऱ्यांचा मुक्काम जामखेडच्या शासकीय बंगल्यात. एके दिवशी आमचा मित्र रमेश मेढेकरला अपरात्री विंचू डसला. तो किंचाळत उठला. त्याच्या शेजारी मी. प्रकार लक्षात आल्यावर मी जब्बारला जागं केलं. हातात कंदिल घेतलेला, लेंगा-बनियनवर असणारा जब्बार, विव्हळत चालणारा रमेश आणि त्याला सावरत चालणारा मी - माझ्या मनाच्या कॅमेऱ्यामध्ये क्लोजअप ते लाँगशॉट टिपलेलं दृश्य! त्या मध्यरात्री डॉ. आरोळे यांच्या भव्य हॉस्पिटलचं दर्शनही मला रमेश मेढेकरच्या विंचूदंशामुळेच झालं.

'जैत रे जैत', 'उंबरठा', 'सिंहासन', 'एक होता विदूषक' अशा जब्बारच्या चित्रपटांत मी छोट्या-छोट्या भूमिकेत होतोच. जब्बारनं काम करायला बोलावलं आहे; याचा अर्थ काळ-वेळ, संसार, मुलं, पत्नी यांचा काहीही विचार न करता पळत सुटणं हा माझा खाक्या! अर्थात इतक्या वर्षांच्या सहवासानंतर घरच्यांनाही माझी जब्बारवरील 'भक्ती' मान्य झालेली आहे.

भास्कर चंदावरकर, हृदयनाथ मंगेशकर यांनी जब्बारनं दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांना दिलेल्या संगीताला विशेष अर्थ आणि वेगळेपण आहे. तीच गोष्ट 'एक होता विदूषक' या चित्रपटाची. गीतरचना ना. धों. महानोर आणि संगीतकार आमचा 'घाशीराम'पासूनचा सहकारी मित्र आनंद मोडक.

आनंद मोडक त्या वेळी पर्वतीजवळच्या एका छोट्या बिल्डिंगमधल्या छोट्या खोल्यांच्या फ्लॅटमध्ये राहत होता. जब्बारचा निरोप आला - आज रात्री ९-९.३० वाजता मोडकच्या घरी ये. जब्बारनं दिलेल्या ऑर्डरप्रमाणे मी गेलो. काही वेळानं

मिस्कील आणि मनस्वी. प्रेमळ आणि फटकळ. नर्मविनोदी आणि स्पष्टवक्ती. आग्रही आणि पारदर्शी. सईच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडणारे आत्मकथन!

सय : माझा कलाप्रवास

सई परांजपे

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ४०)



काखेत भलीमोठी फाईल घेऊन जब्बार आला. मोडकनं पेटी घेतली. हात सरसावले. मान उंच करून मोडक्या महानोरांचं एक-एक चाल लावलेलं गीत जब्बारला - अर्थात मलासुद्धा ऐकवत होता. 'कुठं तुम्ही गेला व्हता सांगा कारभारी', 'श्रावणाचं ऊन मला झेपेना', 'तुम्ही जाऊ नका हो जाऊ नका हो रामा'. 'वा, क्या बात है!' जब्बार दाद देत होता. 'काय राम्या, मस्त आहे की नाही?' जब्बारची एक सवय आहे. तो त्याच्याबरोबर असलेल्या कोणालाही आपल्या बाजूचा साक्षीदार बनवतो. मधूनच त्यानं आपल्याबरोबर आणलेली फाईल काढली. ना. धों. महानोरांचा 'वही' हा गीतप्रकार त्यात होता. त्यातील निवडक भागावर जब्बारनं आधीच खुणा केल्या होत्या. त्यातील काही गीतांना चाली बांधण्यासाठी तो तो भाग मोडकला देत होता. शेजारच्या खोलीत मोडकच्या घरातली माणसं झोपलेली. मधूनच चहाची 'तल्लफ' यायची. मी स्वयंपाकघरात 'चायवाल्या'च्या भूमिकेत. जमेल तसा चहा करायचो. रात्री दोन-अडीचपर्यंत हा सिलसिला! जब्बारच्या बरोबरीचे हे क्लोजअपचे क्षण माझ्यासाठी फार फार मोलाचे आहेत.

तरीही - तरीही मी जब्बारच्या टाइट क्लोजअपमध्ये नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे. कारणं काहीही असोत, पण हे अगदी खरं आहे.

पण माझ्या भरकटलेल्या कलाजीवनाला 'दिशा' देणारा; उत्तम कलाकृती, वाचन, मनन, चिंतन, अनुकरण करणारा आणि स्वत:ची अशी स्वतंत्र प्रतिमा निर्माण करणारा दिग्दर्शक

'श्री. जब्बारस्वामी पटेल'


हेच सत्य!

शुभं भवतु।


***श्रीराम रानडे***

९८२३१४४७०९






मेहमूद, किशोरकुमार, प्राण, हेलन या सर्वार्थानं मोठ्या कलाकारांच्या द्वारकानाथ संझगिरी यांनी खास त्यांच्या स्टाईलनं सांगितलेल्या गोष्टी.

## आम्हाला वगळा...

द्वारकानाथ संझगिरी

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ४०)

# क...
# कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर


## सुखान्तपत्र (Living Will) : एक गझल

गझल ए जिंदगी मी मस्त मजेत गायलो
सारून दूर पाश सर्व निस्संग परत चाललो
भळाळते घाव तीव्र ते शुष्क आता जाहले
अर्पिले जे सर्वोत्तम निर्माल्य बनुनी पावले
अनादी, अगम्य संसार रसरसून खेळलो
कवेत मृत्यू घेउनी कृतार्थ, शांत जाहलो
नको नळ्या, नको सुया आणि वाट पाहणे
बिल वाढे भरमसाठ, निष्फळ कर्ज काढणे
मंदावेल, डगमगेल, थांबेल ही भ्रमणगाथा
कशी? कधी? कोठे? नको व्यर्थ प्रश्न आता
करू त्वचा-नेत्र दान, लाभू दे प्रकाश कोणा
'देता सारे तो उरे', श्रीशिल्लक ही जाणा
अखेरचा श्वास मंद घेईन आपुल्या घरी
असो हाती प्रिय हात, एक आस अंतरी

सुखान्तपत्र सोपवून मोकळा मी जाहलो
काय करा, नका करू अखेरबाबत बोलली.

***प्रसन्न दाभोलकर***

## ‘राजहंसी’ कवितादालन



रंगीबेरंगी वातावरणात रंगलेले शैशव. नंतर रानावनात हिंडण्याची, निसर्गात रमण्याची नितांत आवड. कुंवार जंगलाचे अननुभूत सुख आणि अरण्यवासी आदिवासींचे निसर्गजीवन जवळून पाहताना मनावर पडलेली रानाची मोहिनी.
यातून उमललेल्या कवितांच्या भावफुलांमधून श्वासाश्वासात सामावलेला काव्यगंध.

### रानगंध

मीनल प्रधान

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ४०)

एकाच कवीने तीन वेगवेगळ्या काळांच्या पटावर नजर ठेवून आयुष्याचे जे तत्त्वज्ञान तयार केले आहे, ते जगण्याचा हिशेबच.
हा कवितासंग्रह म्हणजे कवीच्या जगण्याचा वैचारिक लेखाजोखा!

### आतून उगवलेल्या कविता

प्रा. प्र. द. कुलकर्णी

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ४०)





‘साहित्य अकादमी युवा पुरस्कार’ विजेता काव्यसंग्रह!
समकालीन वास्तवात सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अंगाला भिडणाऱ्या निरनिराळ्या अवस्थांच्या कविता!

### मी संदर्भ पोखरतोय

पवन नालट

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ४०)

# उद्‌गार

नियतकालिकांचे/
समाजमाध्यमांचे अभिप्राय

वसुंधरेचे शोधयात्री

## समुद्र सफरींचा इतिहास

*गेल्या दोन सहस्रकांतल्या जगभरातल्या सागरी शोधमोहिमांचा तपशिलात वेध घेताना, त्या प्रत्येकीच्या बऱ्या-वाईट परिणामांचीही सूत्रात्मक नोंद लव्हेकर करतात; त्याने या ग्रंथाला साहसी थरारकथांपलीकडचे संदर्भमूल्य मिळते.*

'वसुंधरेचे शोधयात्री' हे डॉ. अनुराग लव्हेकर यांचे पुस्तक, शीर्षकाप्रमाणेच नव्या भूभागांच्या शोधार्थ झालेल्या समुद्रावरील साहसी मोहिमांचा दस्तावेज आहे. ख्रिश्चन कालगणना सुरू झाल्यापासूनच्या दोन सहस्रकांतल्या जगभरच्या मोहिमांची ही एकत्रित चित्तथरारक वगैरे म्हणता येईल अशी गाथा आहेच; पण हे वरवरचे वर्णन झाले. एवढ्या प्रदीर्घ काळात जगात झालेल्या भौगोलिक आणि ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचेही काही मूल्यमापन ते या अंगाने करू पाहते. इतिहासाला, त्यातल्या दूरगामी बृहत्परिणाम घडवून आणणाऱ्या घटितांना अनेक बाजू, कारणपरंपरा असतात. गेल्या दोन सहस्रकांतल्या जगभरातल्या सागरी शोधमोहिमांचा तपशिलात वेध घेताना, त्या प्रत्येकीच्या बऱ्या-वाईट परिणामांचीही सूत्रात्मक नोंद लव्हेकर करतात; त्याने या ग्रंथाला साहसी थरारकथांपलीकडचे संदर्भमूल्य मिळते. हे एका विशिष्ट तिठ्यावरून, तरी पूर्वग्रहविरहित दृष्टीने काळाचा दीर्घ पट्टा न्याहाळणे आहे.

लहानपणी गोष्टीतल्या सात सफरींमधून भेटणारा सिंदबाद, वॉस्को द गामा, कोलंबस, अल्फान्सो अल्बुकर्क, फार तर मार्को पोलो, इब्न बतुता असे इतिहासाच्या पुस्तकात वाचलेले काही पुसटसे उल्लेख. सामान्य वाचकांची धाव एवढ्यातच संपते. या लोकांचे यश आधीच्या कैक यशस्वी, अपयशी मोहिमांच्या खांद्यांवर उभे आहे, याची जाणीव हे पुस्तक वाचून होते. धाडसी खलाशांनी प्रायोजक सत्ताधीशांना सादर केलेले प्रस्ताव, जहाजांवरच्या लॉगबुकमध्ये केलेल्या नोंदी, खलाशांनी पाठवलेली पत्रे, कुणी लिहिलेल्या दैनंदिनी यांतून लव्हेकर तपशिलांमधून उद्दिष्ट, प्रत्यक्ष मोहीम, तिचे झालेले परिणाम सांगत आदि-मध्य-अंत अशी कथा मूर्त करतात. त्यातल्या मोकळ्या जागा अट्टाहासाने भरत, त्यातील धाडसाचे उदात्तीकरण करणे टाळतात, हे महत्त्वाचे. राहण्यायोग्य जमिनी, गुलाम, मौल्यवान खनिजे यांचा

शोध, व्यापाराच्या संधी अशा अनेक कारणांनी वेगवेगळ्या राजवटी अशा मोहिमा घेत आल्या. या पुस्तकात इतिहासातल्या अशा ठळक मोहिमांचा लेखाजोखा मांडला आहे. मोहीम अपयशी झाली, तरी त्याच्या पुढे आधारभूत होतील अशा तपशिलात नोंदी ठेवल्या जात. प्रवासमार्ग, मधली बेटे-बंदरे, तिथे चालणारा व्यापार, त्याची साधने, राज्यकर्ते आणि समाजजीवन, हवामान-नद्या-पर्वत, प्रवासाला अनुकूल काळ अशा या विस्तृत नोंदींसाठी 'पेरिप्लस' असा शब्द आहे. असा पहिला उपलब्ध पेरिप्लस इसवी सन ४० ते ६० या काळातला तांबड्या समुद्राचा, रोमन राजवटीत तयार झालेला आहे. त्याने या पुस्तकाची सुरुवात होते, तर शेवटी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातली रोआल्ड अमुंडसेन याची ध्रुवीय प्रदेशातील मोहीम येते. दरम्यान पार्श्वभूमी, आफ्रिका, अमेरिका, उर्वरित जग आणि भारताचा संदर्भ अशा पाच भागांतील ३९ प्रकरणांमधून सागरावरचा हा दीर्घ कालपट अनेकांगांनी मूर्त होतो. शेवटी असलेली पारिभाषिक संज्ञा आणि कालपट ही दोन परिशिष्टे उपयुक्त आहेत; पण पुढील अभ्यासाच्या दृष्टीने वापरलेल्या संदर्भग्रंथांची सूचीही असायला हवी होती. शेवटच्या प्रकरणात लेखक या मोहिमांमागचे उद्देश आणि प्रत्यक्षात त्यांचे झालेले परिणाम यांवर चिंतनात्मक भाष्य करतो, ते महत्त्वाचे आहे.

या सफरींचा उपयोग स्वस्त आणि मुबलक गुलामांच्या वाहतुकीसाठी होण्यातून झालेली माणुसकीची दीर्घकालीन विटंबना, स्थानिक जातींवरचे त्यातील काही नामशेष होण्यापर्यंत झालेले अत्याचार, धर्मांतराचा आसुरी आग्रह, डोळे दिपवणाऱ्या नफ्यातून वसाहतवादी स्पर्धा-हिंसाचार यांसह चित्र-शिल्प-संगीत-साहित्यादी कला; तसेच सामाजिक गुणधर्म, जीवनमूल्ये आदींची देवाणघेवाण, मानवी ज्ञानात एकूणच पडत गेलेली भर अशा विधायक बाबींवरही लव्हेकर थोडक्यात, तरी उद्बोधक चर्चा करतात.

'भरकटलेले सारेच वाट चुकत नाहीत,' असे जे. आर. आर. टॉल्किनचे एक अन्वर्थक वाक्य पुस्तकाच्या सुरुवातीलाच येते. 'किनारा तुला पामराला' म्हणत अथांग सागरात अनेक खलाशांनी उज्ज्वल भविष्यासाठी आपली नौका लोटून दिली. त्यांतील बरेच भरकटलेही; पण त्यातूनही त्यांनी नवी मळवाट शोधली, तिथून जग बदलांच्या वाटेने गेले. हे पुस्तक म्हणजे त्यातले अपघात, हिंसाचार, त्यातून भरभराटीस आलेला वसाहतवाद, शोषण हे सगळे जमेला धरूनही, माणसाच्या आजच्या ज्ञानात्मक वाटचालीत असलेले त्यांचे बरे-वाईट योगदान स्मरून, त्यासाठी त्यांना कृतज्ञतेने केलेला सलाम आहे, वाचायलाच हवा असा.

***नितीन वैद्य***

(*'महाराष्ट्र टाइम्स'*, ५ सप्टेंबर २०२३मधून साभार)

# राजहंसी पार

काय घडलं
'राजहंसी' नगरीत?

## 'वाङ्मयीन युगान्तर आणि श्री. पु. भागवत' पुस्तक प्रकाशन




डावीकडून : डॉ. सदानंद बोरसे, दिलीप माजगावकर, सुधीर रसाळ,
महेश एलकुंचवार, अशोक भागवत, वसंत पाटणकर आणि शेखर गोडबोले

मराठी साहित्य जगतातील प्रतिभाशाली संपादक श्री. पु. भागवत यांचे २०२३ हे जन्मशताब्दी वर्ष आहे. यानिमित्ताने 'राजहंस प्रकाशन' आणि 'अक्षरधारा बुक गॅलरी'तर्फे श्री. पु. भागवत यांच्या संपादकीय कर्तृत्वाचा वेध घेणाऱ्या 'वाङ्मयीन युगान्तर आणि श्री. पु. भागवत' या ग्रंथाचे प्रकाशन १६ डिसेंबर २०२३ रोजी ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी श्री. पु. भागवत यांचे चिरंजीव आणि 'मौज प्रकाशन गृहा'चे अशोक भागवत, 'राजहंस प्रकाशन'चे संचालक दिलीप माजगावकर आणि ज्येष्ठ समीक्षक व ग्रंथाचे संपादक डॉ. सुधीर रसाळ उपस्थित होते.

प्रकाशकीय मनोगत व्यक्त करताना दिलीप माजगावकर म्हणाले, ''मुळात माझी आणि श्री.पुं.ची ओळख खूप उशिराची. भेटी फार तर चार-सहा. फोन तुरळक. काहीसा

पत्रव्यवहार होता. पण इतरांपेक्षा एक वेगळी गोष्ट मात्र आमच्यात होती. त्यांचा बहिश्चर प्राण म्हणता येईल असे मंगेश पाडगावकर हा आमच्यातला घट्ट विणीचा एक दुवा होता. मी श्री.पुं.विषयी पाडगावकरांकडे आणि श्री.पु. माझ्याविषयी पाडगावकरांकडे चाळीस वर्षं सतत बोलत असायचे. त्यातून एक माणूस म्हणून, एक संपादक म्हणून, एक प्रकाशक म्हणून श्री. पु. कसे होते; त्यांची कामाची, विचाराची, लेखकाशी चर्चा करण्याची पद्धत कशी होती; लेखकाशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध कसे होते-अशा अनेक गोष्टी मी समजून घेत होतो. जोडीला 'मौजे'ची अनेक प्रकाशनं मी बारकाईनं पाहत होतो, अभ्यासत होतो. शाळा-कॉलेजमध्ये मी पाठ्यपुस्तकं जितकी गंभीरपणं अभ्यासली नाहीत, त्यापेक्षा जास्त मी मौजेच्या काही पुस्तकांचा अभ्यास केला. श्री.पुं.चे विषय, त्यांचे लेखक, त्यांची लेखनशैली आणि एकूण संपूर्ण पुस्तकामागचा त्यांचा विचार मी समजून घेत होतो. पाडगावकरांशी त्याबाबत बोलत होतो. वाद घालत होतो. श्री.पुं.च्या सर्व गोष्टी मला पटायच्या, आवडायच्या असं नाही; पण त्यामागं त्यांनी काही एक विचार केला आहे हे लक्षात यायचं. या सगळ्यातून श्री.पु. आणि त्यांचं काम हे केव्हा माझ्या विचारांच्या केंद्रस्थानी जाऊन बसलं, हे मलाही कळलं नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर कोरोनापूर्वी श्री.पुं.चे चिरंजीव अशोक भागवत यांच्याकडून या ग्रंथाच्या प्रकाशनाची विचारणा झाली. त्या वेळी 'राजहंस'नं 'नाही' म्हणायचा प्रश्नच नव्हता. उलट ज्यांचं काम डोळ्यांसमोर ठेवून आपण व्यवसायात वाटचाल केली, त्या श्री.पुं.विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची एक संधी म्हणूनच मी या ग्रंथाकडे पाहिलं आणि हा ग्रंथ प्रकाशित करण्याचा निर्णय 'राजहंस'नं घेतला.''

डॉ. रसाळ म्हणाले, ''श्री. पु. भागवत हे मराठी नववाङ्मय चळवळीचा प्रभाव ओळखून असलेले सर्जनशील संपादक होते. नवचळवळीचे व्यासपीठ म्हणून


मराठवाड्यात जन्मलेल्या, लहानाचा मोठा झालेल्या
एका संवेदनशील वाङ्मय-अभ्यासकाची ही कहाणी.
त्याची एकट्याची नाही, तर मराठवाड्याची अन्
तिथल्या माणसांची कहाणी. लेखकाच्या निमित्तानं
साकारलेली त्याच्या जगाची ही कहाणी

लोभस : एक गाव - काही माणसं
सुधीर रसाळ

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ४०)

'सत्यकथे'चे माध्यम त्यांनी वापरले. कलात्मकता हा त्यांच्या संपादनाचा मुख्य गाभा होता.''

प्रकाशनानंतर एलकुंचवार म्हणाले, ''सत्यकथा ही मराठी साहित्यातील मोठी वाङ्मयीन घडामोड होती. पण आजच्या पिढीला कालच्या या सांस्कृतिक घडामोडींविषयी आस्थाच नाही. आपल्याकडे लेखनाचा मोठा आवाज ऐकूच येत नाही. त्यात बऱ्याचदा अभिनिवेश असल्याचे मी श्री.पुं.ना बोलून दाखविले. त्या वेळी 'समाज जसा असतो, तसे लेखक समाजाला मिळतात' असे उत्तर श्री.पुं.नी मला दिले होते. त्या वेळी मराठी सामाजाच्या एकूण 'अभिजातते'ची ओळख त्यांनी मला करून दिली, असे मी मानतो.''

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना बोकील-कुलकर्णी यांनी केले. प्रकाशनानंतर ज्येष्ठ गायक पं. सत्यशील देशपांडे यांची 'शब्द शास्त्रीय संगीतातला...' ही विशेष मैफील रंगली.

## 'मी सखा मेघदूत' पुस्तक प्रकाशन



डावीकडून : हर्षदा पंडित, डॉ. सदानंद बोरसे,
सुनीला गोंधळेकर, माधवी वैद्य आणि राजेंद्र चाफळकर

दि. २५ डिसेंबर २०२३ रोजी, 'राजहंस प्रकाशन' यांनी प्रकाशित केलेल्या आणि सौ. हर्षदा पंडित यांनी लिहिलेल्या 'मी सखा मेघदूत' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पुण्याच्या 'स्वा. सावरकर अध्यासन केंद्रा'च्या सभागृहात दिमाखात पार पडला. पुस्तकांच्या या अफाट विश्वामध्ये एका सुंदर पुस्तकाने प्रवेश केला!

या समारंभात 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठा'त संस्कृतच्या प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या विदुषी सौ. सुनीलाताई गोंधळेकर अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. मा. श्री. दिलीपजी माजगावकर यांच्या विशेष उपस्थितीत डॉ. माधवीताई वैद्य यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. राजहंसचे संपादक, सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक व

लेखक डॉ. सदानंद बोरसे आणि बांधकाम क्षेत्रातले नामवंत व्यावसायिक व लेखक श्री. राजेंद्र चाफळकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. सदानंद बोरसे म्हणाले, ''महाकवी कालीदासांचं 'मेघदूत' म्हणजे एका यक्ष-यक्षिणीची ताटातूट झालेलं विरहकाव्य! पण सौ. हर्षदाताईंचं पुस्तक म्हणजे मूळ मेघदूतचा 'सिक्वेल' आहे! जिथे कालिदासाचं मेघदूत संपतं, तिथे लेखिकेचा कल्पनाविलास सुरू होतो. त्यामध्ये यक्षाकडून निरोप घेऊन जाणारा मेघ यक्षिणीला भेटतो अन् परत यक्षाकडे येऊन क्षेमकुशल सांगतो, तेव्हाच हे वर्तुळ पूर्ण होतं. प्रसन्न भाषाशैलीतलं हे पुस्तक इतकं सुंदर झालं आहे, की माझी प्रस्तावना ही त्याला लावलेली तीट आहे!''

श्री. राजेंद्र चाफळकर म्हणाले, ''वाचकांना हवे आहे तेच लिहिणे आणि वाचकांची अभिरुची उंचावणारे लिखाण करणे, असे दोन पर्याय लेखकापुढे असतात. त्यातला दुसरा मार्ग हर्षदाताईंनी निवडला. या पुस्तकाला ज्ञानपीठ मिळो ही सदिच्छा.''

या पुस्तकाचे प्रकाशन ज्यांच्या हस्ते झाले, त्या डॉ. माधवी वैद्य यांनी 'मी सखा मेघदूत'मधल्या अनेक वाक्यांचा संदर्भ देत त्यातली सौंदर्यस्थळे अधोरेखित केली. तसेच ' 'मी सखा मेघदूत' वाचणे म्हणजे त्या स्वच्छंद आणि आनंदी मेघाच्या तितक्याच मुक्त आकाशात विहरण्याचा आनंद घेणे आहे इतके आपण पुस्तकांशी एकरूप होतो', असाही अभिप्राय त्यांनी दिला.

समारंभाच्या अध्यक्षा, संस्कृतच्या प्राध्यापिका सौ. सुनीलाताई गोंधळेकर यांनी, मूळ 'मेघदूत' या काव्यातला मेघाचा रामगिरी ते कैलासपर्वत हा सौंदर्याचा आस्वाद घेणारा सुंदर प्रवास थोडक्यात पण सुरेख उलगडला आणि याच कालिदासासारखी श्रीमंती राखत हा विचार हर्षदाताईंनी पुढे नेला आहे, असा निर्मळ अभिप्राय दिला. तसेच हर्षदाताईंचे पुस्तक वाचल्यावर संस्कृतमधले मूळ काव्य वाचले जाईल, असा




रसाळांना जशी माणसे आठवतात, गावे आठवतात;
तसा तो काळही आणि त्यावेळची संस्कृतीही आठवते.
ही व्यक्तिचित्रे जशी काही गावांची आणि काही माणसांची आहेत,
तशीच ती एका मावळलेल्या संस्कृतीचीही आहेत.
– नरेन्द्र चपळगावकर

माणसं जिव्हाळ्याची

सुधीर रसाळ


किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ४०)

आशावादही व्यक्त केला.

सौ. हर्षदा पंडित ह्यांनी 'मी सखा मेघदूत' ह्या पुस्तकामागचा उद्देश सांगितला. 'मेघदूत ही नुसती यक्ष-यक्षिणीची विरहकथा नसून प्रेमभावनेच्या असंख्य छटा व्यक्त करणारी एक मानसयात्रा आहे, सजीव झालेल्या मेघाला मानवी जन्माचा मूलाधार असलेल्या मनाचा स्पर्श झाल्यावर त्यातल्या प्रेमभावनेच्या साक्षात्कारानेच तो भारावून गेला असणार. मेघ यक्षाकडे परतून त्याने यक्षपत्नीची खुशाली पुन्हा यक्षाला कळवल्याशिवाय मेघदूताची ही मानसयात्रा पूर्ण होणार नाही', असे सांगितले.

सर्व वक्त्यांच्या विचारांचा आढावा घेत सूत्रसंचालन करणाऱ्या 'ध्यास अभ्यास गटा'च्या सौ. लीना कुलकर्णींनी मेघाबरोबरचा आपला हा विहंगम प्रवास प्रेम या उदात्त भावनेच्या विविध छटा अनुभवत कृतज्ञता या उन्नत भावनेपाशी थांबतो, अशी भावना व्यक्त केली. तसेच 'मेघजन्मापासून सुरू झालेले 'मी सखा मेघदूत' हे पुस्तक म्हणजे खरोखरच कल्पनेची नितांत सुंदर आणि उत्तुंग अशी भरारी आहे! या पुस्तकाशी आपण इतके एकरूप होतो की वाचक म्हणून मेघाबरोबरचा आपला प्रवासही अत्यंत प्रवाही आणि विलोभनीय ठरतो, असे मत व्यक्त केले.

❖


विविध क्षेत्रांत लखलखीत कामगिरी केलेल्या अनेक वलयांकितांची शब्दचित्रे म्हणजे वाचकांसाठी एक संपन्न मैफीलच!

राग दरबारी काही वलयांकित गाठी भेटी

शोभा बोंद्रे


किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ४०)

साठोत्तर प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमीचे केवळ साक्षी नव्हे, तर निरनिराळ्या नात्यांनी प्रत्यक्ष सहभागी असलेले प्रतिभावान रंगकर्मी माधव वझे यांनी अनेक संदर्भबिंदूंच्या मदतीने घेतलेला पाश्चात्त्य आणि मराठी रंगभूमीचा अभ्यासपूर्ण वेध.


समांतर रंगभूमी :
पल्याड-अल्याड

माधव वझे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ४०)



## 'राजहंसी' विविधा



१८९८ ते १९०८ हा लोकमान्यांचा राजकीय कर्तृत्वाचा माध्यान्हकाळ! आधी ते नामदार टिळक होते, नंतर ते 'लोकमान्य' झाले. याच त्यांच्या लोकमान्यत्वाच्या पैलूंचा वेध!

### अष्टावधानी लोकमान्य

अरविंद व्यं. गोखले

किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ४०)

नोकरी मागणारा नव्हे, तर अनेकांना नोकरी देणारा तरुण उद्योजक. विकासाचा वसा घेतलेल्या हणमंतराव गायकवाडांची अन् 'भारत विकास ग्रुप'ची कहाणी!

### असाही एक किमयागार

अंजली ठाकूर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ४०)





ही कहाणी केवळ आकाशात भरारी घेणारा वैमानिक कायमसाठी चाकाच्या खुर्चीत जखडबंद होतो त्याची नाही, तर पुनश्च 'राखेतून उगवतीकडे' निग्रहाने झेपावतो, त्याची आहे.

### राखेतून उगवतीकडे

विंग कमांडर अशोक लिमये

अनुवाद : सोनाली नवांगुळ

किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ४०)



# वाचकांच्या मनातलं...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## आरोही - विशेष फूल फुलताना

सौ. राजेश्वरी किशोर,

नमस्कार.

सौ. वर्षा करंबेळकर यांनी आपलं 'आरोही' मला पाठवलं.

विशेष 'फुला'चा जन्म ते आजपर्यंत तिच्यासह आपला प्रवास वाचताना ठायी ठायी कंठ दाटूनही येतो व 'शाब्बास' असा उद्‌गारही ओठी येतो. प्रत्येक पालकाचा प्रवास असाच असतो. काही ते 'प्राक्तन' म्हणून सोडून देतात, काहींची घालमेल होते, पण फूल 'फुलवण्या'चा प्रयास करत नाहीत / करू शकत नाहीत.

अनुकूलता - प्रतिकूलता कुटुंबागणिक वेगळी असते. प्रत्येकाची संवेदनशीलता अन् सोशिकता वेगळी असते. काही जण आपल्याप्रमाणे मूल हे सर्वस्व मानून त्यासाठी आयुष्यभर संघर्ष करीतही असतात.

आपण अतिशय सुजाणपणे आरोहीचे आव्हान स्वीकारले व कमालीच्या धैर्याने अन् प्रेमाने त्यासाठी सारे केले व करीत आहात.

आपल्यातील मातेला विनम्र अभिवादन! सारी कथा ओघवत्या भाषेत लिहिली आहे. राजहंसने अतिआस्थेने निर्मिती उत्तम दर्जाची केली आहे.

'जर' आणि 'तर' मोठे महाभारत सामावले असते, पण त्याचे काही एक उत्तर नसते; त्याचा उपयोगही नसतो. फक्त मनातल्या मनात साऱ्या जीवनपटाचे सिंहावलोकन निवांतक्षणी होतच असते.

आपण व मी एकाच नावेतील प्रवासी आहोत. २७ वर्षांच्या प्रवासानंतर आमच्या मुलाने - कौस्तुभने निरोप घेतला, त्यालाही आता पंधरा वर्षे झाली. म्हणून आपल्या साऱ्या प्रवासाचे कौतुक वाटते व 'जर' 'तर' मनात येतेच.

'थांब थोडा वेळ', 'अजून अवकाश आहे' असं म्हणत, तुला दवाखान्यात

जाण्यापासून थांबवलं, हा 'जर'चा पहिला बिंदू आहे. वेळेवर गेली असतीस, तर आरोही एक नॉर्मल मुलगी म्हणूनच जन्माला आली असती.

पण... त्याची कारणमीमांसा तशी निरर्थकच आहे. 'हे असे व्हायचेच होते', असा दैववाद, अशा प्रकारचा तर्क दिला जातो. 'स्वीकारणे' तेवढेच आपल्या हाती राहते. पण धैर्याने तू आव्हान स्वीकारले व जगण्याचा प्रत्येक क्षण ते पेलण्यासाठी तुझा संघर्ष पाहून थक्क झालो.

अवतीभवती माया, करुणा असलेल्या व्यक्ती मिळाल्या, तेव्हा संघर्षाची धार थोडी कमी होताना वाचले, तेव्हा समाधान वाटले.

'तर'चा प्रवास सर्वांत समाधानाचा टप्पा, म्हणजेच पानसे गुरुजींनी 'दुसरे मूल होऊ दे', हा दिलेला सल्ला! आलापचा जन्म झाला व जगण्याला एक नवा अर्थ मिळाला. आरोहीच्या जडणघडणीत आलापच्या असण्याचे महत्त्व आहेच व कायमच तो तिची काळजी घेईल, असे आश्वासनही आहे!


तिचे एक एक पाऊल पुढे पडण्यासाठी, तू घेतलेले कष्ट, तिचे आजारपण, तिचे भरणपोषण, हीच 'आरोही'ची कथा आहे.

गावे, माणसे, परिस्थिती बदलत गेली, बदलली नाही तुझ्यातील 'आई'!

विविध प्रसंगांतील फोटो पाहताना छान वाटले, प्रवास प्रत्यक्ष पाहिल्याचे समाधान मिळते.

'ससा आणि कासव'मध्ये आरोही-आलापमधील अनुबंध छान व्यक्त झाले. प्रकरणाच्या अखेरीस 'कहाणी सुरूच राहील, अडचणी येत राहतील, मार्ग सापडतील, अडचणीला सामोरे जाऊ'... असा तू विचार करणे योग्य तर आहेच आणि अशा प्रवासातील एक सहप्रवासी म्हणूनही 'अनुभवाचे बोल'... म्हणून काही मुद्दे तू, किशोर व आलापसमोर ठेवावे असे वाटले, म्हणून थोडे लिहितो.

माझे वय ८० आहे. तीस वर्षे एक संस्थात्मक काम करीत आहे. डोंबिवलीजवळ

जावेद अख़्तर यांची चित्रपटकारकीर्द यशानं झळाळणारी,
तर त्यांची वेळोवेळी केलेली वक्तव्यं वादाचा धुरळा उडवणारी.
त्यांच्या या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर
प्रकाश टाकणारं चरित्र.

जावेद अख़्तर

मंगला गोडबोले

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ४०)

‘खोणी’ गावात विशेष मुलांचा अखेरच्या श्वासापर्यंत सांभाळ करण्यासाठी ‘घरकुल’ उभे केले आहे. शेकडो पालकांशी संबंध आला, संवाद झाला, तो अनुभव गाठीशी आहे.

‘जीवात जीव असेपर्यंत मीच सांभाळ करेन, ताई व दादांचं या बाळावर अतीव प्रेम आहे, तो कधीच अंतर देणार नाही.’ अशा आशयाचा संवाद नेहमीच ऐकायला मिळतो.

पण आपल्यानंतर हे मूल राहणार आहे, हे वास्तव स्वीकारून योग्य तो निर्णय पालक घेताना दिसत नाहीत. विशेष मूल प्रौढ होते, पालक अतिज्येष्ठ होतात व दोघांपैकी एक जण अगोदर निरोप घेतो, मग सगळे बदलून जाते. भावंडांचे प्रेम नसते, असे नाही; पण परिस्थितीच अशी उद्भवते, की त्याला आपल्या अपत्यांचा सांभाळ करताना, एक कसरत करावी लागते. मग बरोबरीच्या विशेष भावंडाचे काय करावे, असा यक्षप्रश्न समोर उभा राहतो. उत्तर नसलेला हा प्रश्न असतो.

वास्तव स्वीकारून, आपण जोपर्यंत उभे आहोत, कार्य करू शकतो; तोपर्यंत काही व्यवस्था करायला हवी व संस्थात्मक व्यवस्था हीच लाँग लास्टिंग असते. आणि योग्य संस्थेचा शोध, हा एक मार्ग आणि अशा पालकांनी एकत्र येऊन संस्था उभी करणे, हा खरा मार्ग असतो. - हा माझ्या अनुभवाचा व चिंतनाचा भाग आहे. पाहा काही करता येईल का?

तू, किशोर व आलापचे मन:पूर्वक कौतुक.

आरोही या परीराणीला स्पेशल केक.


***अविनाश बर्वे***

अमेय पालक संघटना

८३५५८५६२८४




‘क्लोज एन्काउंटर्स’मध्ये दिसणारा कामाठीपुरा सत्तर आणि ऐंशीच्या दशकांतला आहे. या पुस्तकातल्या चोवीस भागांतून पुरुषोत्तम बेर्डे आपलं बालपण, पौगंड आणि तारुण्य यांच्या साक्षीनं अनेक माणसांच्या आयुष्यांच्या आत डोकावतात.

**क्लोज एन्काउंटर्स**


पुरुषोत्तम बेर्डे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ४०)



## खास बालवाचकांसाठी लिहिलेली 'राजहंसी' पुस्तके

मागवा खालीलपैकी १ पुस्तक किंवा ३ पुस्तके - ट.ख. ४०/-




स्थलांतर करू पाहणाऱ्या पक्ष्यांच्या एका थव्याला, प्रवासामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. एका टप्प्यावर प्रत्यक्ष नेत्याचे नीतिधैर्य संपते. नेताहीन थवा दिशाहीन होऊन विखुरतो, प्रवासात शिकून शहाणा होत असलेला एक लहान पक्षी त्याला धीर देतो. त्याची गोष्ट सांगणारे -

**नंदनवन** (संगीत-नृत्य-नाट्य)

माधव वझे


किंमत : ₹ ५०/-


बुद्धिमत्ता असूनही केवळ मुलगी म्हणून विज्ञानसंस्थांमध्ये प्रवेश नाकारला जाण्याचा तो काळ. अनेक अडचणींना तोंड देत, लढवय्या वृत्तीने त्या पुढे गेल्या आणि जैवरसायनशास्त्राच्या क्षेत्रात मूलभूत संशोधन केले. त्यांचे प्रेरक चरित्र-

लढाऊ वृत्तीच्या वैज्ञानिक **कमला सोहोनी**

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ ८०/-





केरळमधल्या एका लहानशा गावात जन्मलेल्या. प्रतिकूल परिस्थितीतही विज्ञानशाखेचे शिक्षण घेणाऱ्या भारतातल्या पहिल्या महिला वनस्पतिशास्त्रज्ञ. आपले सगळे आयुष्य संशोधनाला वाहिलेल्या स्त्री शास्त्रज्ञाची स्फूर्तिदायक गोष्ट.

**वनस्पतिशास्त्रज्ञ जानकी अम्मल**

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ ८०/-

# आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग

आनंद देशपांडे हे सर्वपरिचित व्यावसायिक आणि त्यांची सगळ्यात महत्त्वाची ओळख म्हणजे पहिला मराठी अब्जाधीश. ‘पर्सिस्टंट सिस्टिम्स’ ही कंपनी पुण्यात स्थापन झालेली आयटी कंपनी गेल्या काही वर्षांत अवाढव्य झाली आणि बाहेरच्या देशात कंपन्यांचं अधिग्रहण करत पर्सिस्टंटनं अटकेपार झेंडे रोवले. ज्या काळात असं म्हंटलं जायचं, की मराठी माणूस व्यवसाय करू शकत नाही, त्या काळात आनंद देशपांडे यांनी पर्सिस्टंटची स्थापना केली आणि व्यवसाय कसा मोठा करायचा याचा परिपाठ मराठी माणसाला दिला.

अशा उतुंग व्यक्तिमत्त्वाला भेटताना मला थोडं दडपण आलं होतं. पण त्यांच्या वागण्यात आणि बोलण्यात इतका सहजपणा होता, की अर्धा तास कसा गेला कळलंच नाही आणि त्या दिवशी मला हे कळलं, की लेखक होण्यातला आनंद काय असतो. मी त्यांच्यासाठी घेऊन गेलेल्या पुस्तकाच्या प्रतीवर आनंद देशपांडेंनी माझी सही घेतली, यापेक्षा मोठा क्षण आयुष्यात काय असू शकतो? एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर मराठी थ्रिलर पुस्तक नक्की वाचलं जातं, असं म्हणत ॲमेझॉनवरून उपलब्ध असलेल्या माझ्या पुस्तकाच्या सर्व प्रती ऑर्डर करून टाकल्या आणि वर त्याचा स्क्रीनशॉटदेखील मला दाखवला. तो अर्धा तास खरंच स्वप्नवत असाच होता. एका लेखकासाठी यापेक्षा जास्त महत्त्वाचं काय असू शकतं?


***अपूर्वा प्रदीप जोशी***
यांच्या फेसबुक पेजवरून साभार

पद्मभूषण माधव गाडगीळ म्हणजे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व!
केवळ निसर्गप्रेमी वा निसर्ग-अभ्यासकांनाच नव्हे,
तर भवतालाबद्दल कुतूहल असणाऱ्या प्रत्येकाला
एका वेगळ्या विविधरंगी जगाचे दर्शन घडवणारी
त्यांची जीवनसफर.

सह्याचला आणि मी : एक प्रेमकहाणी

माधव गाडगीळ

किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ४०)



# सह्याचला आणि मी : एक प्रेमकहाणी

नमस्कार, माधव गाडगीळांचे नवीन प्रकाशित पुस्तक ‘सह्याचला आणि मी : एक प्रेमकहाणी’ हातात पडले.

क्लास.

तुमचे तर विशेष आभार, पण रोहन एंटरप्रायझेस तर खास आभार.

काय नेटके आणि जबरदस्त आकर्षक पुस्तक झालेय...

‘पेंग्विन’, ‘रुपा’, ‘हार्पर कॉलिन्स’ची, ‘थॉम्सन’ची हार्डबाऊंड बघितली; पण इतक्या उच्च दर्जाचे हार्डबाऊंड आणि इतकी सुबक दर्जाची पुस्तकबांधणी... खूपच समाधान, आनंद सर्व काही वाटले..

आणि सर्वांत महत्त्वाचे..

गिरीश सहस्त्रबुद्धे हा आमच्यासाठी व्हॅन गॉग!

लहानपणापासून ‘छात्र प्रबोधन मासिका’पासून मुखपृष्ठे बघत आलो... गिरीश सर is the ultimate!!

अतिशय नितळ नेटकी आणि आकर्षक.. मन अगदी शांत होते...


अतिशय समृद्ध चित्रकार...

खूप वाचले चित्रकारांविषयी.. चित्रेही पाहिली.. पण गिरीश सहस्त्रबुद्धे.. यासम हाच.. प्रज्ञावंत चित्रकार.. राजहंसला भेटलेला जादूगार परीस.. आणि साक्षात व्हॅन गॉगच... मोनेटपेक्षाही वर...

मनापासून सांगितले.

बाकी सदैव शुभेच्छा!

टॉप आहात.. टॉपच राहणार..

चंदनचोरी अन् हस्तिदंताची तस्करी. १२४ पाशवी हत्या. अनेक धाडसी अपहरणं. तीन राज्यांच्या पोलिसांना वीस वर्षं दिलेली झुकांडी. अशी भीषण कृत्यं करणाऱ्या क्रूरकर्म्याला यमसदनाला धाडणाऱ्या के. विजय कुमार या आयपीएस अधिकाऱ्यानं सांगितलेली सत्यकथा.

## वीरप्पन विरुद्ध विजय कुमार

के. विजय कुमार । अनुवाद : डॉ. सदानंद बोरसे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ४०)

अशीच दर्जेदार निर्मिती करा... वाचकवर्ग वाढतोय...

बाकी.. गिरीश सरांकडून खरेच भरपूर काम करून घ्या... अजून अनुभवायची आहेत चित्रे...

शि. द. फडणीसांसारखे ग्रेट!

***अक्षय पाटील***, बारामती

## वीरप्पन विरुद्ध विजय कुमार

अजून वाचलं नसेल, तर जरूर वाचा. पोलिसांच्या नावानं ऊठसूट बोटं मोडणाऱ्यांनी तर जरूर वाचलं पाहिजे, असं हे पुस्तक आहे. अंदाजे १९८० ते २००४पर्यंत चंदनतस्कर क्रूरकर्मा वीरप्पनला पकडण्यासाठी कर्नाटक आणि तामिळनाडू पोलिसांनी राबवलेल्या मोहिमांचं वर्णन वाचून अंगावर काटा उभा राहिला. त्यासाठी त्यांना दिलं गेलेलं प्रशिक्षणदेखील तेवढंच खडतर! वीरप्पनशी लढताना हाताची तीन बोटं गमावलेला पोलीस ऑफिसर पुन्हा त्याला पकडण्याच्या मोहिमेत स्वत:हून सहभागी होतो, या जिद्दीला आणि धैर्याला सलाम! या मोहिमेत सहभागी अनेकांनी, वीरप्पनला पकडल्याशिवाय स्वत: लग्न न करण्याची प्रतिज्ञा घेतली होती आणि ती निभावलीही. आपल्या आयुष्याची वीस-वीस वर्षं त्यासाठी थांबावं लागलं, पण ध्येयापासून ते ढळले नाहीत. अनेकांना यात प्राणही गमवावे लागले.

ऑक्टोबर २००४मध्ये वीरप्पनला पकडण्यात यशस्वी झालेल्या एका पोलीस अधिकाऱ्याने लिहिलेली ही पराक्रमाची गाथा! ही वाचल्यावर 'तेथे कर माझे जुळती' हीच भावना या समस्त पोलीस अधिकाऱ्यांविषयी!

***प्रणिता खंडकर***

पेरू देश म्हणजे गूढ आणि रहस्यमय ठिकाणांची खाण.
विस्तीर्ण पठारावर विसावलेल्या प्राणी-पक्षी-मानवाच्या
रेखाकृती म्हणजे जणू नोहाची नौकाच!
इतिहासाच्या पोटातील अशी गूढ रहस्ये आपल्या
भूमीवर वागवणाऱ्या देशाची वेधक सफर.


रहस्यमय 'पेरू'

डॉ. संदीप श्रोत्री

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३३०/- । (ट.ख. ₹ ४०)



## ‘राजहंसी’ विविधा



गुणवंत माणसांच्या परीसस्पर्शानं आपल्या आयुष्याचं खऱ्या अर्थानं सोनं होतं!
स्वत:च्या झळाळत्या तेजानं बरोबरच्या आयुष्यांनाही लखलखवणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची तेजाळ शब्दचित्रं.

### चंदेरी - सोनेरी

विलास शेळके

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ४०)

त्सुनामीने सर्वांत जास्त घायाळ केले ते निकोबारला, तरीही पुन्हा त्यावर उमेदीने वसवलेली वस्ती... अशा या अस्पर्शित, काहीशा ज्ञात, खूपशा अज्ञात भूमीचा इतिहास, भूगोल आणि लोकसंस्कृती उलगडून दाखवणारे.

### निकोबारची नवलाई

राजेश्वरी किशोर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ४०)







आपल्या प्रासादिक कलागुणांनी साहित्य, नाट्य, संगीत अन् सिनेमाचा परिसर उजळून काढणाऱ्या सात कलंदर व्यक्तिमत्त्वांना जाणून घेण्यासाठी वाचा...

### शुभ्र काही जीवघेणे

अंबरीश मिश्र

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ १७५/- । (ट.ख. ₹ ४०)

# रहस्यमय पेरू

नमस्कार संदीपजी,

कळविण्यास आनंद होतो, की आपण लिहिलेले ‘रहस्यमय पेरू’ हे पुस्तक माझ्या वाचनात आले. तुमच्या अतिसूक्ष्म निरीक्षणातून साकारलेले पुस्तक वाचताना मला त्या क्षेत्रामधून अक्षरश: स्वप्नवत कळत नकळत भ्रमंतीच्या आनंदाची अनुभूती लाभली. नकाशे, छायाचित्रे, ऐतिहासिक महत्त्व, प्राचीन संस्कृती, गूढ/रहस्यमय ठिकाणे, स्थापत्यकला, संग्रहालय, आधुनिक तंत्रज्ञान, प्राचीन परंपरा, पक्षी, वन्य तथा जलचर प्राणी, संस्था, रमणीय ठिकाणे, व्यक्तींची नावे, स्थानिक उच्चारांसहित तथा पाहिलेल्या परिसराचे हुबेहूब वर्णन, प्रवासातील अडचणी, त्यांवरील उपाय इत्यादी आठवणींत ठेवून, स्वत:चा वैद्यकीय व्यवसाय सांभाळून उच्च दर्जाची पुस्तके लिहिण्याचा छंद जोपासणे, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. तुमच्या या अफाट, अचाट प्रतिभेला माझा खडा सलाम...

***चैतन्य पंडित,*** ८२९१२२५९१६

**मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांवरील पुस्तकांविषयी**

- सीता — किंमत : ₹ ३५०/-
  अभिराम भडकमकर
- ओंजळीतील चाफा — किंमत : ₹ २८०/-
  स्वानंद कुलकर्णी
- संभ्रमाची गोष्ट — किंमत : ₹ ३८०/-
  पी. विठ्ठल
- मी सखा मेघदूत — किंमत : ₹ १८०/-
  हर्षदा पंडित
- आरोही — किंमत : ₹ ३६०/-
  राजेश्वरी किशोर
- काफ्काचं मेटॅमॉर्फोसिस — किंमत : ₹ २००/-
  डॉ. सुहास भास्कर जोशी
- आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग — किंमत : ₹ ३००/-
  अपूर्वा प्रदीप जोशी
- वाङ्मयीन युगान्तर आणि श्री. पु. भागवत — किंमत : ₹ ६००/-
  संपा. : सुधीर रसाळ आणि वसंत पाटणकर

## ‘राजहंस बुक क्लब’ योजना नव्या आकर्षक स्वरूपात !

कोणतेही
१ पुस्तक
५०%
सवलतीत
२००रु.
१ वर्ष

कोणतीही
२ पुस्तकं
५०%
सवलतीत
३५०रु.
२ वर्षं

कोणतीही
३ पुस्तकं
५०%
सवलतीत
५००रु.
३ वर्षं

आणि सभासदत्वाच्या मुदतीत राजहंसची सर्व पुस्तकं २५% सवलतीत! वर्गणीच्या मुदतीत ‘राजहंस ग्रंथवेध’ मासिक सप्रेम भेट

Download on the App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी


आमच्या
नवनवीन योजनांसाठी
‘राजहंस ॲप’
बघत राहा.

GET IT ON Google Play
अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी



## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुल्मोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- शुभांगी देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९






एका विशेष मुलीच्या आईचं हे अनुभवकथन
कुटुंबाचं विशेष मुलावरचं प्रेम वाढवण्यासाठी,
त्याच्या आयुष्यातील नैराश्य कमी करण्यासाठी,
त्याला समजून घेण्यासाठी नक्कीच वाचावं असं...

**आरोही**
राजेश्वरी किशोर

फ्रांझ काफ्का हा विसाव्या शतकातील
एक महत्त्वाचा लेखक.
याशिवाय काफ्काचा जीवनपट आणि त्याचे लेखन,
'मेटॅमॉर्फोसिस'चे आस्वादक विश्लेषण,
त्याच्याशी नाते सांगणाऱ्या साहित्यकृतींचा परामर्श
यांचा समावेश असलेले पुस्तक.

**काफ्काचं 'मेटॅमॉर्फोसिस'**
डॉ. सुहास भास्कर जोशी




कसे घडतात आर्थिक घोटाळे?
कसे सापडतात त्यांचे सूत्रधार?
आर्थिक गुन्ह्यांचं गुंतागुंतीचं विश्व
सोप्या भाषेत उलगडून दाखवलंय,
शोधक वृत्तीच्या नि भेदक नजरेच्या
एका तरुण फोरेन्सिक ऑडिटरनं...

**आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग**
अपूर्वा प्रदीप जोशी

Registered
Rajhans Granthavedh
(REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO,Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48

‘मौज’ साप्ताहिक, ‘सत्यकथा’ मासिक आणि ‘मौज प्रकाशनगृह’ या तिन्ही विभागांनी वाङ्मय आणि कला या क्षेत्रांत श्री. पु. भागवतांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कार्याचे आणि या तिन्ही विभागांत श्री. पु. भागवतांनी केलेल्या संपादनाचे स्वरूप वस्तुनिष्ठ भूमिकेतून तपासण्याचा प्रांजळ प्रयत्न.

वाङ्मयीन युगान्तर
आणि
श्री. पु. भागवत
संपादक
सुधीर रसाळ आणि वसंत पाटणकर




प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक ‘राजहंस’ प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**